२२जून ७८/१रूपया

# माणूस






आजचा सत्कार
महापालिकेच्या यशस्वी
उमेदवारांचा आहे 'पोट' निवडणूकीच्या
उमेदवारांचा येथे संबंधच नाही!


खरे तर तुळशीबरोबर
रोज तुम्हाला नमस्कार
केलाय तरी सुद्धा
तुमचे भाव वाढावेत?
वनस्पती
श्यामजोशी


बाईंचे हात बळकट करण्याच्या कामी मदतीचा हात द्याल ना ?


तुम्हाला भात पचत नाही ? 'त्यांच्या' मुलांना 'तीन कोटींचा भात' कसा पचतो हो ?

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | २२ जून | अंक : चवथा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


# न्या. हिदायतउल्ला, दर्डा आणि मुख्यमंत्र्यांचे चिटणीस

माहितगार

राज्यपाल आपल्या अधिकारात विधान परिषदेवर काही सदस्यांची नेमणूक करतात. ही नियुक्ती सरकारच्या सल्लामसलतीने केली जाते. अशा पद्धतीने काही जणांची नियुक्ती करण्यामागे निरनिराळ्या क्षेत्रातील तज्ञाच्या ज्ञानाचा उपयोग व्हावा हा हेतू गृहीत धरलेला असतो. परंतु घटनेतील उदात्त तरतुदी घटनेतच राहातात. प्रत्यक्षात वर्णी लावण्याचा कार्यभाग साधला जातो. काही जणांवर कृपा-दृष्टीची बरसात होते. त्यामुळे एकेक व्यक्ती अनेक संस्थांवर नेमली जाते. हेही कमी वाटून काहींना राज्यसभा वा विधान परिषदेवर नेमण्यात येते. अशा व्यक्ती शुद्ध चारित्र्याच्या असतात असाही अनुभव नसतो. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग व्हावा हा हेतू असतो; पण नेमलेल्यांपैकी बहुतांश व्यक्ती सभागृहात तोंडही उघडीत नाहीत. साहाजिकच ते कशात तज्ञ आहेत, त्यांच्या कोणत्या ज्ञानाचा उपयोग सरकारला व सभागृहाला होतो हा संशोधनाचाच विषय आहे. ज्याचे चारित्र्य संशयास्पद आहे, ज्याच्याबाबतीत भ्रष्टाचारापासूनचे अनेक प्रवाद आहेत त्यांची वर्णी का लागते? ते त्यातील तज्ञ आहेत म्हणून !

सरकारची काही महामंडळे आहेत, मंडळे आहेत. त्यातून या महामंडळे—मंडळे यांच्या संचालकांना अर्थलाभ होतो किंवा होण्यासारखा असतो अशा संचालकांची राज्यसभा किंवा विधान परिषदा यावर नियुक्ती करता येत नाही. महाराष्ट्रात यासंबंधी प्रश्न निर्माण झाला आहे. त्याच्या घटनात्मक बाबीचा विचार करीत नाही. पण ज्यावेळी हा प्रश्न उपस्थित केला तेव्हा असे सांगण्यात आले होते की राज्यपालांनी नियुक्त केलेल्या व्यक्तीच्या सदस्यत्वाला कायदेशीर हरकत घेणारा अर्ज राज्यपालाकडे करण्यात आला होता. राज्यपालांनी हा अर्ज व त्यावरची सरकारची मते मागवली होती. पण सरकारने त्याला उत्तर दिले नव्हते. या आरोपाला मुख्यमंत्री श्री. नाईक यांनी 'राज्यपालांनी अशाप्रकारची विचारणा करणारे पत्र पाठवले आहे याची आपल्याला माहितीच नव्हती, परंतु या प्रकरणी चौकशी केली जाईल व नियुक्तीसंबंधीच्या कायदेशीरपणाशी राज्य सरकारचा संबंध येत नाही, तो निवडणूक मंडळाच्या कक्षेतील प्रश्न आहे. या या प्रकरणीच्या कक्षेचा प्रश्न महत्त्वाचा वाटत नाही. कारण ती तरतूद कायद्यात नमूद केलेली आहे.' असे उत्तर दिले होते.

याप्रकरणी श्री. नाईक यांनी प्रांजळपणे वस्तुस्थिती सांगितली आहे असे प्रथमदर्शनी वाटेल. पण तर्क व व्यवहार यांच्या कसोटीवर याचा विचार केला पाहिजे. तो विचार करू लागलो की कुठेतरी पाणी मुरत आहे हा संशय बळावू लागतो. राज्यपालाकडून गेलेल्या पत्राची मुख्यमंत्र्यांना माहिती नसणे म्हणजे मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात अनागोंदी आहे असे म्हणावे लागेल. मुख्यमंत्र्यांचा खुलासा पटण्यासारखा वाटत नाही. राज्यपालांचे पत्र घेऊन राज्यपालांचा पट्टेवाला आला आणि त्याने मुख्यमंत्र्यांच्या पट्टेवाल्याकडे राज्यपालांचे पत्र दिले असे होणार नाही. राज्यपालाचे पत्र घेऊन जबाबदार व्यक्ती आली आणि तिने मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातील जबाबदार व्यक्तीकडेच पत्र दिले असणार ! त्यामुळे राज्यपालांचे पत्र मुख्यमंत्र्यांच्या सचिवाकडे किंवा खासगी चिटणिसाकडे दिले असणार. त्या पत्रात मुख्यमंत्र्यांच्या मित्राच्या नियुक्तीसंबंधी विचारणा केलेली पाहून त्यांनी ते पत्र नाईक यांना दाखविणे स्वाभाविक आहे. मुख्यमंत्र्यांच्या निकटच्या मित्रासंबंधी विचारणा केलेली असतांना ते पत्र मुख्यमंत्र्यांना न दाखवता पत्रातील विचारणेची पूर्तता करण्याएवढी नोकरशाही अजून कर्तव्यदक्ष झालेली नाही. राजापेक्षा राजनिष्ठ असलेली नोकरशाही मुख्यमंत्र्यांच्या माणसाविषयी आक्षेप घेतलेले असताना त्याची गंधवार्ता मुख्यमंत्र्यांना लागू देत नाही. परस्पर त्याची विल्हेवाट लावीत असेल तर ही बाबच गंभीर मानावी लागेल. नोकरशाही हे धारिष्ट्य करण्याचा विचारसुद्धा मनात आणणार नाही. सरकारच्या सल्ल्यावरून राज्यपाल नियुक्ती करतात. या नियुक्तीच्या कायदेशीरपणाला हरकत घेतली जाते ही बाब साधी नाही. मित्राची बाब म्हणून नव्हे तर एरवीही बाब गंभीर आहे. असे असताना मुख्यमंत्र्यांना अधिकारी अंधारात ठेवीत असतील तर अशा अधिकाऱ्यांना कार्यक्षम सरकारने क्षणभरही अधिकारावर ठेवता कामा नये !

अशा गंभीरप्रकरणी जर नोकरशाही मुख्यमंत्र्यांना अंधारात ठेवीत असेल तर सरकारच्या वकुबाविषयीही संशय निर्माण होतो ! सरकारची नोकरशाहीवर पकड नाही. तिला सरकार—मुख्यमंत्री

यांचा धाक राहिलेला नाही हे यामुळे स्पष्ट होते. पण ही वस्तुस्थिती नाही श्री. नाईक याना राज्यपालाचे पत्र येताच ते दाखवलेलेच असणार याविषयी शका येण्याचे कारण नाही. या पत्राची चौकशी करण्याचे आश्वासन स्वत श्री. नाईक यानी दिले होते. मध्यतरी कित्येक महिन्याचा कालावधी लोटला आहे. एवढ्या कालावधीत ही चौकशी पूर्ण झाली नाही ? एक पत्र मुख्यमन्त्र्यापासून लपवले जाते याची चौकशी होण्यास ५–६ महिन्याचा कालावधी लागत असेल तर हे सरकार काय करते तरी काय ? असेच म्हणावे लागेल. मुळात हे पत्र मुख्यमन्त्र्याना दाखवले नाही हे तर्काला पटत नाही. आणि खरेच ते पत्र त्याना दाखवले नसले तर ज्यानी हा गलथानपणा केला त्याना अजून अधिकारावर कसे ठेवले जाते हे कळत नाही. भाकरी कशीही फिरवा ती गोलच आहे मुख्यमन्त्र्याना पत्र दाखवले असणार हाच निष्कर्ष निघतो !

राज्यपालानी नियुक्ती केलेल्या सदस्याच्या नियुक्तीच्या कायदेशीरपणाबद्दलच्या पत्रात सरकारचा सबध येतो कोठे ? तो राज्यपाल व निवडणूक मडळ याचा प्रश्न आहे अशी भूमिका मुख्यमंत्री श्री. वसतराव नाईक यानी जाहीरपणे घेतली आहे. या भूमिकेला कोणी विरोध करायचे कारण नाही. तशी ती निर्भेळ वाटावी ! ही भूमिका अलिप्तपणा दाखवते ! सरकार केवढे अलिप्तपणे पाहते या प्रश्नाकडे ! पण त्यातही मुत्सद्दीपणा आहे मित्राच्या प्रश्नातही श्री. नाईक अलिप्तपणे विचार करीत असतील तर ते फार चागले लक्षण मानावे लागेल ! पण या अलिप्तपणाचा फुगा लौकरच फुटला. सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश हिदायतउल्ला याचा या प्रश्नाबाबत सल्ला घेण्यात आला. नियुक्त सदस्य श्री. दर्डा व मुख्यमन्त्र्याचे चिटणीस श्री. नाशिककर स्वतः श्री. हिदायतउल्ला याच्याकडे गेले होते. ज्याच्या नियुक्तीला हरकत घेतली आहे त्याने कोणाचाही कायदेशीर सल्ला घ्यावा. त्याला ते स्वातत्र्य आहे. पण मुख्यमन्त्र्याचे चिटणीस हा सल्ला घेण्यासाठी का जातात ? श्री. हिदायतउल्ला याच्याशी माझे बोलणे झाले तेव्हा श्री. नाशिककर हे सरकारचे प्रतिनिधी म्हणून आले होते असे त्याच्या बोलण्यत आले. या प्रकरणी सरकारची भूमिका अलिप्तपणाची होती तर मग श्री. हिदायतउल्ला याचा सल्ला घेताना मुख्यमन्त्र्याच्या चिटणिसानी जाण्याचे कारणच काय ? मुख्यमंत्री किंवा सरकारला कायदेशीर सल्ला अॅडव्होकेट जनरलकडून घेता आला असता ! त्याच्याकडून सल्ला घेतला नाही असे मला म्हणावयाचे नाही; पण श्री. हिदायतउल्ला याच्या सल्ल्याची गरज अलिप्तपणाची भूमिका घेणाऱ्या सरकारला का पडावी ? या एकाच गोष्टीमुळे सरकारचा अलिप्तपणा बगळ्याच्या ध्यानाप्रमाणे वाटतो.

राज्यपालाचे पत्र मुख्यमन्त्र्याच्या पाहाण्यात आले होते की नाही ? सरकारची अलिप्तपणाची भूमिका श्री. हिदायतउल्लांच्याकडे श्री. नाशिककर गेल्यामुळे सशयास्पद झाली की नाही ? हे प्रश्न राज्यपालानी विधान परिषदेवर नियुक्त केलेल्या सदस्याच्या कायदेशीरपणाच्या घटनेपुरते आहेत. श्री. हिदायतउल्ला याच्या सल्ल्याप्रमाणे ही नियुक्ती कायदेशीर ठरते; त्याप्रमाणे ती कायदेशीर ठरेलही ! त्यात विशेष काही नाही. विशेष आहे ते पुढेच ! एका प्रमुख मन्त्र्यानेच ती गोष्ट सागितल्यामुळे कळली. अन्यथा ती बाहेर कळणे दुरापास्तच होते ! अर्थात ही घटना मी त्या मन्त्र्याच्या शब्दात सागतो. हा मत्री खोटे सागणाऱ्यापैकी नाही, असा माझा विश्वास आहे. म्हणून नमूद करतो. त्याची सत्यता पडताळून पाहणे तेवढे सोपे नाही.

'राज्यपालानी नियुक्त करावयाच्या आणखी काही जागा रिकाम्या आहेत. त्या भरण्यासाठी सरकारने राज्यपालाकडे यादी पाठवली. राज्यपालानी त्यातील काही नावे अमान्य केली.' अलिकडेच केलेल्या नियुक्तीच्या सदर्भात जे प्रश्न निर्माण झाले त्यामुळे राज्यपालानी ही नावे अमान्य केली असे या मन्त्र्याचे म्हणणे ! एवढ्यावर हा मंत्री थाबला नाही. राज्यपालानी ही नावे अमान्य केल्यावर मुख्यमन्त्र्यानी पतप्रधानाना या प्रकरणी पत्र पाठवले. यादी नाकारण्याचा अधिकार राज्यपालाना आहे हे नाकारत नाही; पण सरकारने पाठवलेली यादी अमान्य करण्याची प्रथा नाही असे पतप्रधानाना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे, अशी माहिती या मन्त्र्याने सागितली. कोणाही मन्त्र्याने सागितले की ते खरे, असे मी मुळीच मानीत नाही. मन्त्र्यांनाही मी अडवले, हे तुम्हाला कसे कळले ? असा सरळ प्रश्न केला तेव्हा त्यानी 'मुख्यमन्त्र्यानी जरी यादी कळवली तरी त्याचा काही सहकाऱ्याबरोबर खल या ना त्या प्रकारे केला जातोच.' असे उत्तर दिले. थोडक्यात या मन्त्र्याबरोबर या सदर्भात काही तरी बोलणे झालेले असणार म्हणूनच त्यांना ही माहिती मिळाली असेल हा माझा निष्कर्ष !

राष्ट्रपती व राज्यपाल हे घटनात्मक प्रमुख आहेत. सरकारच्या सल्ल्याप्रमाणे त्यांनी वागावयाचे असते. परतु सरकारने सुचवलेली गोष्ट राष्ट्रपती किंवा राज्यपाल अमान्य करतात तेव्हा ती बाब गभीर असते ! घडलेल्या घटनेचे गाभीर्य विचारात घेऊन या प्रकाराचा विचार झाला पाहिजे. पण असे होणे म्हणजे सरकारवर घटनात्मक प्रमुखाचा विश्वास राहिला नाही हाच त्याचा अर्थ ! □ □

---

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

---

# पाकमधील अहमदियाविरोधी दंगली

## वा. दा. रानडे

पाकिस्तानात अहमदिया पथाविरूद्ध सर्व विरोधी पक्षानी सयुक्त आदोलन चालविले असून या पथास बिगर मुस्लीम अल्पसख्य जमात ठरवावे, तिच्या सभासदाना महत्त्वाच्या अधिकारपदावरून दूर करावे आणि स्वत ला या पथाचे तिसरे खलिफा म्हणविणारे मिर्झा नासिर अहमद याना अटक करावी अशा त्याच्या मागण्या आहेत.

प्रथम पजाबात या आदोलनास सुरुवात झाली. विशेष म्हणजे स्वत:ला जातिधर्मनिरपेक्ष म्हणविणारे पक्षही ही मागणी करीत आहेत. पाकिस्तान नॅशनल असेंब्लीच्या सभासदांचे वसतिगृहापुढे दोन हजार लोकानी अहमदिया विरोधी निदर्शन केले. त्याना पांगविण्यासाठी पोलिसानी अश्रुधूर सोडला. त्याच्या निषेधार्थ विरोधकानी असेंब्लीतून सभात्याग केला. असेंब्लीत यावेळी भारताच्या अणुस्फोटावर चर्चा चालू होती या प्रश्नावर सबध देशाने एकमुखी भूमिका घ्यावी असे भुट्टोना वाटत होते पण विरोधकाना भारतीय अणुस्फोटापेक्षा अहमदियाविरोधी आदोलन अधिक महत्त्वाचे वाटले.

वृत्तपत्रांवरील कडक सेन्सॉर निर्बंधामुळे अहमदियाविरोधी चळवळीने खरोखर काय परिस्थिती निर्माण झाली आहे हे कळायला मार्ग नाही पण पंजाबमधील अनेक शहरात अहमदिया जमातीच्या लोकावर हल्ले झाले. त्याच्या मालमत्तेची लुटालूट व जाळपोळ करण्यात आली अशा अनधिकृत बातम्या आहेत जातीय दगलीच्या बातम्यासबधी वृत्तपत्रावर असलेले निर्बंध उठवावेत तसेच अहमदिया पंथाचे मुख्य पीठ जेथे आहे त्या राबवाह शहरात प्रवेशावर असलेले निर्बंध रद्द करावेत अशीही विरोधी पक्षाची मागणी आहे.

अहमदिया पंथाला पाकमधील मुस्लिमाचा एवढा विरोध का हे समजण्यासाठी या पथाचा थोडा इतिहास पाहिला पाहिजे. मिर्झा गुलाम अहमद यानी १८७९ साली या पथाची स्थापना केली. जगात या पथाचे एक कोटी लोक आहेत व त्यापैकी निम्मे पाकिस्तानात आहेत आणि बाकीचे निम्मे आफ्रिका, इडोनेशिया आणि युरोपात विखुरलेले आहेत. जगातील मुस्लिमाचे नेतृत्व करण्यासाठी अल्लाने पाठविलेले प्रेषित आपण आहोत असा या पंथाचे सस्थापक मिर्झा गुलाम अहमद याचा दावा होता तर महमद पैगबरानतर अल्लाचा खरा प्रेषित कोणी असणे शक्य नाही अशी बहुसख्य मुस्लिमाची श्रद्धा आहे. म्हणून अहमदिया पथाला त्याचा विरोध आहे सूफी पथाचे लोक तर त्याचा फारच तिटकारा करतात. वास्तविक पाकिस्तानच्या स्थापनेत जिनाना आणि १९७० साली झालेल्या निवडणुकीत भुट्टोना या पथाने चागला पाठिबा दिला होता. या पथाचे लोक आर्थिक व सामाजिकदृष्ट्या सुस्थितीत आहेत. अहमदिया जमातीने आपल्याला दिलेला हा पाठिबा लक्षात घेऊनच जिनानी सर महमद झाफरुल्लाखान याना पाकिस्तानचे पहिले परराष्ट्रमत्री नेमले. हेग येथील आंतरराष्ट्रीय न्यायालयाचेही ते काही वर्षे अध्यक्ष होते.

पाकिस्तानात अहमदिया जमातीला मुस्लिमाचा विरोध आहे तो केवळ धार्मिक कारणासाठी नसून त्यामागील आर्थिक व सामाजिक कारणेही महत्त्वाची आहेत. या छोट्या सघटित जमातीने आर्थिक व सामाजिक क्षेत्रात महत्त्वाचे स्थान मिळवावे याचे बहुसख्य मुस्लिमाना वैषम्य वाटते. अहमदिया पथाच्या लोकांची वेगळी शिरगणती करण्यात आलेली नाही. तसेच आम्ही अहमदिया पथाचे आहोत असे ते उघडपणे जाहीरही करीत नाहीत. पण अनेक लष्करी व मुलकी वरिष्ठ अधिकारपदे त्याच्या हाती आहेत. तसेच चार वर्षांपूर्वी झालेल्या नॅशनल असेंब्लीच्या व प्रांतिक विधानसभाच्या निवडणुकात आपल्या लोकसख्येच्या मानाने बऱ्याच जागा त्यानी मिळविल्या आहेत. ही गोष्टही बहुसख्य मुस्लिमाच्या मनाला डाचते. लष्कराच्या तिन्हीदलाचे प्रमुखापैकी दोन प्रमुख काही दिवसापूर्वीपर्यंत या जमातीचे होते. आजही लष्करात जनरलच्या हुद्याचे तीन अधिकारी या जमातीचे आहेत. परराष्ट्र खात्यातही अनेक देशात वकिलाच्या किंवा वरिष्ठ अधिकाऱ्याच्या जागा या जमातीच्या लोकाकडे आहेत. या पथाचे इतर लोक मध्यम आकाराचे उद्योगधदे करतात आणि उच्च दर्जाची हॉटेले चालवितात.

पाकिस्तानच्या घटनेने बिगर मुस्लीमाना अध्यक्षपदी व पतप्रधानपदी नेमण्यास बदी केलेली आहे. पण अहमदिया जमातीच्या लोकाची या पदी नेमणूक करता येणार नाही असा स्पष्ट उल्लेख घटनेत केलेला नाही. या सदिग्धतेचा फायदा मिळून या पथाचे नेते देशातील सर्वोच्च अधिकारपदावर येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्याना ही सधी कायमची नाकारण्यासाठी घटनेतील ही सदिग्धता दूर करावी आणि अहमदिया जमातीस बिगर मुस्लीम अल्पसख्य जमात म्हणून जाहीर करण्यात यावे अशी मुस्लिमाची मागणी आहे.

पाकिस्तानात पजाबी, सिंधी, बलुची, पख्तूनी असे भाषिक सघर्ष आहेतच पण जातीय सघर्ष आहेत हे अहमदियाविरोधी दगलीनी दाखवून दिले. पाकिस्तानचे नेते या प्रश्नावर धर्मजातिनिरपेक्ष राष्ट्रवादाची भूमिका घेण्यास तयार नाहीत. वास्तविक अहमदिया जमात पाकच्या स्थापनेपासूनच नव्हे तर त्यापूर्वी पाकिस्तानच्या स्थापनेसाठी झालेल्या झगड्यातही नेहमी पाक नेत्यांच्या बाजूला राहिली, पाकिस्तानशी तिच्या निष्ठेबद्दल शका घ्यायला जागा नाही. पाकचे परराष्ट्रमत्री तसेच आतरराष्ट्रीय न्यायालयाचे अध्यक्ष या नात्याने झाफरुल्लाखान यानी पाक हितसबधीच्या जपणुकीत थोडीही कसूर केली नाही. असे असता या जमातीविरुद्ध पाकिस्तानात दगली का चालू आहेत ? धर्मजातिनिरपेक्ष राष्ट्रवाद पाक नेते स्वीकारण्याचीच शक्यता नाही. कारण तसे केल्याने पाकचा पायाच ढासळेल. पण पाकमधील सारे मुस्लीम एक या बैठकीवर तरी पाक कोठे टिकून आहे ? सध्या अहमदिया जमातीविरुद्ध सुन्नी मुस्लिमानी सुरू केलेल्या दगली या उघड जातीय दगली आहेत. बरीच वरिष्ठ अधिकारपदे अहमदियांच्या हाती असल्याने सुन्नी मुस्लिमाना आपले हितसबंध डावलले जात

आहेत असे वाटते. धर्माधिष्ठित राष्ट्रवादाची पाकची बैठक आधी चुकीची. पण धर्माधिष्ठित राष्ट्रवादाच्या भूमिकेवरूनसुद्धा अहमदियाविरोधी दगली समर्थनीय ठरत नाहीत. अहमदिया हे पाकचे नागरिक आहेत आणि पाकच्या इतर नागरिकाच्या बरोबरीने समान हक्क, अधिकार, सवलती व वागणूक त्याना मिळाली पाहिजे. त्याना बिगर मुस्लीम ठरवा ही मागणी म्हणजे त्याना दुय्यम नागरिक ठरविण्याचा प्रयत्न आहे.

अहमदियाविरोधी दंगली यापूर्वी १९५३ साली लाहोर व पजाबच्या काही शहरात झाल्या होत्या. पण सध्याच्या दगली देशव्यापी आहेत. पजाबमधील रावबाह, मुलतान, लाहोर, गुजंराणवाला, रावळपिंडी, सैंवाळ, ल्यालपूर, वायव्य सीमा प्रांतातील पेशावर, बन्नू आणि कोहट, सिंधमधील कराची, लारखाना, हैद्राबाद, मिरपूर, ताडो आदम येथे दगली झाल्या. त्यात ४१ लोक ठार झाल्याच्या बातम्या आहेत. झाफरुल्लाखान याचे लाहोरमधील घर जाळण्यात आले. पोलिसांनी अहमदियांना सरक्षण देण्याऐवजी दगलखोरानाच मदत केली. विरोधी पक्षानी या दगली सुरू केल्या असे सरकारतर्फे भासविण्यात येत असले तरी ते खरे नसून अनेक ठिकाणी भुट्टोच्या पाकिस्तानी जनतापक्षाचे कार्यकर्त्यांनी दगलीना चिथावणी दिल्याच्या बातम्या आहेत. शुक्रवारी १४ जूनला अहमदिया विरोधी निदर्शकानी देशभर हरताळ पाळला. शातता राखण्यासाठी सर्वत्र लष्कर सुसज्ज ठेवण्यात आले.

भुट्टोनी अहमदियाविरोधकाची मागणी मान्य केली नसली तरी तिला स्पष्ट विरोधही दर्शविलेला नाही. विरोधकांनी त्याना मागणी मान्य करण्यासाठी तीन दिवसाची मुदत दिली होती ती मात्र त्यानी अमान्य केली. नॅशनल असेब्लीकडेच ते हा प्रश्न निर्णयासाठी सोपविणार आहेत आणि सर्वच पक्षाची अहमदियाविरोधी भूमिका लक्षात घेता या जमातीला अखेर बिगरमुस्लीम ठरविले जाईल असे दिसते. पाकशी एकनिष्ठ राहिल्याचे हेच फळ काय, असे या जमातीच्या नेत्यांना वाटत असेल. □ □

कृषी विद्यापीठ
शिवाजी विद्यापीठ
मराठवाडा विद्यापीठ
पुणे विद्यापीठ

भ्रष्टाचारविरोधी आंदोलनासाठी सर्वत्र पार्श्वभूमी तयार होत असताना ह्या विद्यापीठातील अनेक प्रकरणं चव्हाटयावर आली. गाजली.

पवार हटाव !
नाथ हटाव !!
आपटे हटाव !!!

अशा मागण्याचे नारे बुलंद झाले....

११८ वर्षाची आपली परंपरा राखीत, अभिमानाने मान ताठ ठेवीत, मुंबई विद्यापीठ ह्या काळात दिमाखाने मिरवीत होते.

पण हाही डोलारा पोकळच ठरू पाहात आहे !

गेल्या काही वर्षातल्या भ्रष्टाचारांची लक्तरं वेशीवर टांगली जात आहेत. इमारतीवर उधळण्यात आलेल्या पैशांचे गैरव्यवहार उघडकीस आणले जात आहेत....

नव्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला चिदम्बरन् हटाव मोहीम हाती घेतली जात आहे....

ह्या साऱ्यांचा साद्यंत आढावा

# मुंबई (भ्रष्टाचार) विश्वविद्यालय !

'माणूस' मधून लौकरच–

# सोलकढी

## □ हा कसला बाबी ?—
## हा तर ' बॉबी ' रेगे

आपली साहित्यकृती दीर्घकाळ वाजतगाजत राहण्याचे भाग्य फार थोड्या मराठी लेखकांच्या वाट्याला येते. अलिकडच्या काळात विजय तेंडुलकरांना अशा भाग्याची थोडी सवय लागली होती. त्यांनी जणू अशा भाग्याची एकाधिकारखरेदीच केली होती. आत्ता हे भाग्य धारवाडच्या जी. ए. कुळकर्णींच्या पायाशी घोटाळते आहे. त्यांच्या ' काजळमाया ' या कथासंग्रहाने सध्या बऱ्यापैकी धमालधूम उडवली आहे. १ जानेवारी १९७० ते ३१ डिसेंबर १९७२ या तीन वर्षांच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या मराठी पुस्तकातून ' काजळमाया ' या कथासंग्रहाची निवड साहित्य अकादमीच्या राष्ट्रीय पारितोषिकासाठी झाली. असे पारितोषिक मिळाल्यामुळे कोणतेही पुस्तक जितके घमघमते तितके ' काजळमाया 'ही घमघमले. मग १ एप्रिल १९७२ ते ३१ मार्च १९७३ या कालखंडातल्या महाराष्ट्रराज्य पुस्तक-पुरस्काराची दहीहंडी फुटली. त्यात ' काजळमाया ' या पुस्तकाला पुरस्कार मिळाला नाही. त्यामुळे थोडा आरडाओरडा झाला तेव्हा पुरस्कार देणाऱ्या नामांकित निवडसमितीने असा खुमासदार खुलासा केला की पुरस्कार देऊन जसा काही पुस्तकांचा सन्मान तिने केला आहे तसा पुरस्कार न देऊन ' काजळमाया ' या कथासंग्रहाचा तिने विशेष सन्मान केला आहे. असा पुरस्कार न मिळाल्यामुळे कोणतेही पुस्तक जितके छुमछुमते तितके ' काजळमाया 'ही छुमछुमले. ही छुमछुम, आम्ही, ' चि. सौ. का. ' काजळमाया ': बी. ए. (ऑनर्स) ' या विस्तृत स्फुटातून प्रिय वाचकांच्या कानी कर्तव्यदक्षतेने घातली होती.

कर्तव्यपूर्तीच्या सात्त्विक आनंदात आम्ही निमग्न होतो; इतक्यात ७ जून १९७४ च्या महाराष्ट्र टाईम्सच्या अंकात, मुंबईच्या सिद्धार्थ महाविद्यालयाचे वाचनालयप्रमुख शा. श. ऊर्फ बाबी रेगे (मराठीतले हे आणखी एक रेगे) यांचा एक संशोधनपर लेख प्रसिद्ध झाला. या लेखात, ' काजळमाया ' हे पुस्तक कधी प्रकाशित झाले, या प्रश्नाचा शोध घेताना रेग्यांच्या हाती जे नऊ पुरावे लागले ते त्यांनी ' अप्रियता पत्करून ', सादर केले आहेत. लेखाच्या अखेरीस ते म्हणतात : उपर्युक्त पुराव्यांची तपासणी व संकलन केल्यास एकच खात्रीलायक निष्कर्ष निघतो व तो अत्यंत महत्त्वाचा निष्कर्ष म्हणजे ' काजळमाया ' हा कथासंग्रह १९७३ मध्ये प्रकाशित झाला आहे. (पुस्तकावर मात्र १९७२ असा प्रकाशनकाल छापला आहे ! ) आणि हे जर खरे असेल तर हा ग्रंथ ११७३ चे साहित्य अकादमी पारितोषिक प्राप्त करण्यास अपात्र आहे कारण १९७३ चे हे पारितोषिक देताना १ जानेवारी १९७० ते ३१ डिसेंबर १९७२ या कालखंडातील साहित्यकृतीच विचारात घेतल्या होत्या असे अकादमीचे प्रसिद्धीपत्रक म्हणते.

आता आली का पंचाईत साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले म्हणून ' काजळमाया ' या पुस्तकाला महाराष्ट्रराज्य पुस्तकपुरस्कार सन्मानपूर्वक नाकारण्यात आला; आणि आता, तात्त्विक अपात्रतेमुळे, ते साहित्य अकादमीचे पारितोषिकच सन्मानपूर्वक नाकारण्याचा बाका प्रसंग आला आहे. (पारितोषिकाचा ताम्रपट्टिकाकरंडक काय आहे तसा परत करता येईल; पण त्या जी. ए. कुळकर्ण्यांनी त्याचे पाच हजार रुपये रमीत एव्हाना घालवले असले तर कसे हो व्हायचे ? )

हे प्रकरण एवढ्यावर थांबले तर बरे. पण तसे ते थांबणार नाही. कारण कोणीतरी निरुद्योगी व अज्ञ मराठी माणूस, ' काजळमाया ' हे पुस्तक १९७३ साली प्रकाशित झाले असता त्याच्यावर १९७२ असे प्रकाशन साल कसे हो पडले, असा अत्यंत फालतू आणि गैरलागू प्रश्न उपस्थित करील. मग दुसरी काही निरुद्योगी पण सर्वज्ञ मराठी माणसे त्या फालतू आणि गैरलागू प्रश्नाला उत्तरे द्यायला पुढे सरसावतील. वास्तविक अशा अज्ञानी प्रश्नकर्त्यांशी कसे वागावे ते समर्थ रामदासांनी ' अखंड ध्यान ' दशकातल्या ' युगधर्म ' नामे समासात स्पष्ट सांगितले आहे .

आपणास शाहाणे करू नेणे ।
आपले हित आपण नेणे
जनी मैत्री राखो नेणे ।
वैर करी ॥ २९ ॥

ऐसे प्रकारीचे जन ।
त्यासी म्हणावे अज्ञान
तयांपासी समाधान ।
कोण पावे ॥ ३० ॥

(श्रीदासबोध : दशक १४, समास ६)

रामदास पॉप्युलर झाल्याशिवाय कोणाशी कसे वागावे हे आम्हा मराठी माणसांना समजणार नाही असे दिसते.

मराठी माणसाचा विषय निघालाच आहे तेव्हा (साहेब बाळ ठाकरे आणि राव अनिरुद्ध पुनर्वसू यांच्या परवानगीने) बोलतो. मला सांगा, त्या बाबी रेग्याला आत्ताच हे असले खत्रुड संशोधन करायची काही गरज होती का ? बरे, केले एकवेळ संशोधन. येते एकेकाला लहर विळात शेपटी घालायची. पण म्हणून काय लगेच संशोधन जिभेवर ठेवून चव्हाट्यावर बोंब ठोकायची? हा कसला बाबी—हा तर बॉबी रेगे एका मराठी लेखकाला चांगले राष्ट्रीय पारितोषिक मिळाले होते. अशा प्रसंगी आपण तिळगुळ वाटायचा. तर दुसरा एक मराठी माणूस उठतो आणि त्या लेखकाचे पुस्तक त्या पारितोषिकाला अपात्र आहे, असे खुश्शाल सांगून टाकतो. मराठी व महाराष्ट्र याच्याबद्दल राज्यपातळीवर एखाद्या मराठी माणसाने केलेली टीका मी समजू शकतो; पण राष्ट्रीय पातळीवर मराठी व महाराष्ट्र याच्याबद्दल एका मराठी माणसानेच टीका करणे, हा राष्ट्रद्रोही कपाळकरंटेपणा आहे. असो.

' काजळमाया ' हे पुस्तक तात्त्विकदृष्ट्या त्या पारितोषिकाला अपात्र आहे हे ठरल्यावर आता गुणाढ्यदृष्ट्या त्या पारितोषिकाला सर्वस्वी पात्र ठरू शकली असती अशा पाचपंचवीस मराठी पुस्तकांचे स्मरण साक्षेपी मराठी रसिकतेला होईल. मात्र तीही पुस्तके १९७३ साली प्रकाशित होऊन १९७२ चे कुंकू कपाळी मिरवत नाहीत ना, याची एक आपली जुजबी खात्री त्या साक्षेपी मराठी रसिकतेने करावी हे बरे. कारण पूर्वेला उगवणारे सगळेच काही सूर्य नसतात.

साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाल्यामुळे ' काजळमाया ' घमघमले घमघमले.

राज्यपुरस्कार न मिळाल्यामुळे ' काजळमाया ' छुमछुमले छुमछुमले.

आणि अकादमीच्या पारितोषिकाला तात्त्विकदृष्ट्या अपात्र ठरल्यामुळे ' काजळमाया ' दुमदुमले दुमदुमले.

## ☐ गुन्हा केला लग्न करण्याचा

इंग्रजीत ज्याला 'लव्ह' म्हणतात, हिंदीत ज्याला 'मोहब्बत' म्हणतात, त्या प्रेम-प्रकाराबद्दल आणि तत्प्रेमप्रकारसिद्ध विवाह-बद्दल माझी काही खास मते आहेत माझी बहुतेक मते तशी खासच असतात हे 'सोलकढी' वाचणाऱ्या भाग्यशाली वाचकानी केव्हाच जाणले आहे आता 'सोलकढी' न वाचणाऱ्या अभागी वाचकानी एकदा ते जाणले म्हणजे मी एका जबाबदारीतून मोकळा होईन. असो. आपल्याकडे आजकाल प्रेम ही गोष्ट निरोधाइतकी किंवा त्याच्या-पेक्षा जास्त सार्वत्रिक झाली आहे. मी जेथे जेथे नजर टाकतो तेथे तेथे हे प्रेमच प्रेम मला दिसते. काही लोकाच्या असतो त्या-प्रमाणे हा माझ्या नजरेचा दोष नाही; माझी नजर स्वच्छ, निर्मळ, पूर्वग्रहरहित अशीच आहे. अलिकडचे हे प्रेमच वेटे उद्रेकी, उतावीळ, ऊटपटाग आहे.

आम्ही प्रेम करण्याच्या अवस्थेत होतो त्यावेळी हे असे नव्हते आमच्या काळी प्रेम ही एकेकटयाने करायची वस्तू होती. तो तिच्यावर खूप खूप प्रेम करायचा; ती त्याच्यावर कित्ती कित्ती प्रेम करायची; दोघे एकमेकावर जिवापाड प्रेम करायचे. पण दोघाना एकत्र कुणी येऊ देत नसे. दोघे दोन ध्रुवावर तिकडे आणि इकडे असायचे आणि प्रेम करत बसायचे मने जुळलेली असल्यावर देह जुळण्याचे चोजले पुरवायला समाज तयार नव्हता त्यामुळे सगळ्या प्रेमिकाच्या मनात आपले अव्याहत विरहतरग उसळत असायचे. 'कुसुमानिल'योग फारच थोडयाच्या कुडलीत यायचा. एकापरीने देह जुळण्याची भानगड नव्हती तेही बरेच होते, कारण त्यामुळे आजूबाजूच्या गगा, सिंधु, सरस्वतीच यमुनापासून मीनाक्षी, शाता आपटे, नॉर्मा शिअरर, ग्रेटा गार्बोपर्यंत सर्वांवर सारखेच म्हणजे कित्ती कित्ती खूप खूप प्रेम करायला आम्ही मोकळे होतो. शिवाय प्रेम आणि विवाह याची सागड घालण्याचा वैचारिक आणि व्यावहारिक घोटाळा आम्ही करत नव्हतो. प्रेम वेगळे; विवाह वेगळा. त्या दोन अगदी स्वतत्र गोष्टी होत्या. कित्येक वेळा, एखाद्या सुकान्त चद्राननेशी विवाह होणे अशक्य असल्यामुळे तर आम्ही तिच्यावर प्रसंगी तिला 'ताई' मानून, निरपेक्ष प्रेमाची सततधार धरायचो. आता मात्र प्रेम असे एकागी राहिलेले नाही; ते उभयांगी किंवा एकमेकागी झाले आहे. त्यात पुन्हा, जिच्या-बरोबर पुढे विवाह करायचा तिच्याचबरोबर आगाऊ प्रेमाचेसुद्धा चाळे करायचे वैचारिक नि व्यावहारिक खूळ आज समाजात मान्यता पावले आहे. त्यामुळे प्रेमविवाह ही गोष्ट प्रौढविवाहाइतकी सर्रास झालेली दिसते !

या अलिकडच्या प्रेमविवाहाना काही शिस्त आणि जबाबदारीची जाणीव असती तर आम्ही त्यांना फारशी हरकत घेतली नसती. पण आम्ही ज्याअर्थी फारशी हरकत घेतो त्याअर्थी अलिकडच्या प्रेमविवाहांना काही शिस्त आणि जबाबदारीची जाणीव नाही, हे स्पष्ट आहे. हुडयासारखी लग्न-सस्थेला आधारभूत होणारी वजनदार आणि विधायक गोष्ट घ्या. आमच्या वेळी हुडा घेण्याची रूढी होती, अलीकडे हुडा न घेण्याची रूढी पडू लागली आहे. अलिकडच्या तरुणतरुणीना हुडा ही एकप्रकारची लाच वाटते. त्याना मी सागू इच्छितो की अहो हुडा म्हणजे खरोखर सौभाग्यशुल्क, एक-प्रकारची कॅपिटेशन फी ! हुडा न घेता लग्न करणारी अलिकडची तरुण मडळी पुढे आई-बापे झाली म्हणजे मुलाच्या शाळा-महा-विद्यालयप्रवेशासाठी प्रवेशशुल्क अथवा कॅपि-टेशन फीच्या गोडगोडस नावाखाली कसा झक्कत हुडा देतात. तसेच ते आजकाल बोकाळलेले आतरजातीय अनुलोम-प्रतिलोम विवाह. कोठल्याही जातीचा पुरुष आणि कोठल्याही जातीची स्त्री, आपले उठतात आणि लग्न करून झेडे लावायला मोकळे होतात. दोघापैकी एकाने पुरुष आणि दुसरीने स्त्री असणे, एवढीच त्याची पात्रता. (काही विशेष सुसस्कृत देशात तर एवढयासुद्धा पात्रतेची गरज लागत नाही. कारण तेथे स्त्रीचे स्त्रीशी आणि पुरुषाचे पुरुषाशी व्यव-स्थित लग्न होऊ शकते. माझ्या भविष्यवेधी दृष्टीला तर एक काळ असा दिसतो की ज्यावेळी लग्नाला दोघाचीही गरज लागणार नाही . आपले आपल्याशीच लग्न लावता येण्याची काही स्वयभू सोय निर्माण होईल.) अनुलोम-प्रतिलोम प्रेम मला मजूर आहे. आम्हीसुद्धा ते मुबलक प्रमाणात केले आहे. परतु लग्न मात्र सजातीय स्त्री-पुरुषात व्हावे असे आम्ही डोळस श्रद्धेने म्हणतो; कारण असे लग्नच समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने इष्ट, उपयुक्त, आणि कल्याणप्रद ठरते, असे आम्हास वाटते. त्यामुळे यापेक्षा वेगळे असे विजातीय लग्न या भूमडळी कोठे घडत असेल तर ते मोडून काढणे हे आमचे पवित्र धर्मकर्तव्य वाटते.

वरील मजकुरात येणारे 'आम्ही' हे अनेकवचनी सर्वनाम 'मी' या एकवचनी अर्थाने योजलेले असेल असेच तयार वाचकाला वाटेल; कारण सराईत पत्रकाराला ते तसे योजण्याची आदत जडलेली असते; मी मात्र वरील मजकुरातले 'आम्ही' हे अनेकवचनी सर्वनाम अनेकवचनी अर्थानेच योजले आहे. हेच थोडे सोपे करून सागायचे झाल्यास असे सागता येईल की प्रेम आणि विवाह याच्याबद्दल माझ्यासारखीच खास मते अस-लेली आणखी काही मडळी या प्रिय भारत-वर्षात आहेत. आपल्या खास मतासाठी कडवा धर्मसग्राम करण्याची माझ्याप्रमाणेच त्याचीही तयारी आहे, हे एका नुकत्याच घडलेल्या प्रसगात निर्णायक रीतीने सिद्ध झाले आहे.

पजाब प्रातातल्या होशियारपूर जिल्ह्यात महिलपूर येथे गुरू गोविंदसिंग खालसा महा-विद्यालय आहे. हरदयाळसिंग बेदी महा-विद्यालयाचे प्राचार्य आहेत आणि ग्यानी शेरसिंग हे नियामक मडळाचे अध्यक्ष आहेत. या दोन निष्ठावत व कर्तबगार अधिकाऱ्यानी आपले महाविद्यालय चागले नावारूपाला आणले आहे. शिक्षणसस्थेला साजेसे गाभीर्य सहिष्णुता, औदार्य, पावित्र्य तेथे गुण्या-गोविंदाने नादते आहे. महाविद्यालयात इग्रजी विषयविभागात अजितसिंग नावाचे प्राध्या-पक आणि दर्ल्विदर कौर नावाच्या प्राध्या-पिका होत्या. अजितसिंगने आठ आणि दर्ल्विदरने तीन वर्षे अध्यापन केले होते. दोघेही विद्यार्थीप्रिय प्राध्यापक होते अडचण एकच उद्भवली : ते एकमेकाना प्रिय झाले. हे काही तसे अयोग्य, अनुचित, अस्वाभाविक झाले असे नव्हे. एकमेकाना प्रिय होत्साते त्यानी सात जन्म काढले असते तरी त्याना कोणी हटकले नसते. पण नुसते एकमेकाना प्रिय होऊन त्याचे भागेना; एकमेकाशी अधिकृतरीत्या लग्न करायची हाव त्याना सुटली.

ही गोष्ट अत्यत खासगी असल्यामुळे सर्वांना साहजिकच समजली. प्राचार्यांना व नियामक मडळाच्या अध्यक्षाना अजितसिंग दर्ल्विदर कौर याचे लग्न आक्षेपार्ह वाटले.

कारण अजितसिंग 'आदिधर्मी' जातीचा म्हणजे अनुच्च जातीचा होता आणि दल्विदर कौर जाट होती. अटळ विनाशाकडे नेणाऱ्या या वर्णसंकराला, चारित्र्यसंवर्धनाचे कंकण हाती बांधलेल्या गुरु गोविंदसिंग खालसा महाविद्यालय या शिक्षणसंस्थेने सक्रीय विरोध करायचा पवित्रा घेतला. त्यानुसार दल्विदर कौरच्या घरच्या मंडळींनीच या लग्नाला मोडता घालावा असे त्यांना सुचवण्यात आले. कौरमंडळी अजितसिंगला ओळखत होती; त्यांना तो बरा होतकरू वाटला होता. पण महाविद्यालयाच्या संचालकांनी पोक्त सल्ला दिल्यावर त्यांच्यापैकी एकदोघांच्या मनात विकल्प आला. अजितसिंग आणि दल्विदरने परिस्थितीचा अंदाज घेतला; महाविद्यालयातून रजा काढली, आणि दूर जाऊन आधी लग्न उरकून टाकले.

मियाँबिबीचे भले झाले; पण हरदयाळसिंग बेदी आणि ग्यानी शेरसिंग यांचा डोल विस्कटला. लग्न झाले एवढ्याकरता प्रकरण तेवढ्यावरच सोडायला ते धर्माभिमानी सज्जन तयार होईनात अपराध्यांना यथोचित शासन मिळावे म्हणून त्यांनी अजितसिंग दल्विरला नोकरीतून काढून टाकले.

त्यांना नोकरीत परत घ्यावे म्हणून विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. अजितसिंगने या प्रकरणी वरिष्ठ पातळीवर दाद मागितली विद्यापीठाने चौकशी समिती नेमली. तिने, दोघांना कामावर परत घ्यावे असा निर्णय दिला. महाविद्यालयाच्या चालकांनी, चौकशीसमितीचा निर्णय आपल्याला बंधनकारक आहे, असे मानलेले नाही. (वा रे पठ्ठे सत् श्री अकाल. गुरु गोविंदसिंग अमर रहे) पंजाबच्या मुख्यमंत्र्यांनी या बंडखोर दांपत्याला एखाद्या सरकारी महाविद्यालयात चिकटवून घेण्याची तयारी दर्शविली आहे. पण अजितसिंगजवळ एवढा समजूतदारपणा असता तर हे प्रकरण मुळातच उद्भवले नसते. या खालच्या जाती महाहट्टी. अजितसिंगला आपल्या पूर्वीच्याच महाविद्यालयात संचालकांच्या नाकावर टिच्चून, सन्मानाने परत जायचे आहे.

अजितसिंग दल्विदरला मी शुभेच्छा देत नाही. तो अप्रामाणिकपणा होईल. विषम जातीच्या या प्रेमिकांनी प्रेम आणि लग्न याची गल्लत केली. त्याचे प्रेम आदर्श असेल; पण लग्न हा अपराधच होता. अशा अपराध्यांना हरदयाळसिंग बेदी, ग्यानी शेरसिंग, आणि मी 'आपले' म्हणू शकत नाही. ◻

## ◻ दोन्ही बाजूंचा प्रचंड विजय

जॉर्ज फर्नांडिस आणि रेल्वेसंप याच्याबद्दल काही लिहायचे नाही असे मी ठरवले होते खरे म्हणजे झुंजार पत्रकारांप्रमाणे अमुक विषयाबद्दल काही लिहायचे नाही असे मी ठरवतविरवत नाही. पण या वेळी मात्र तसे ठरवलेबिरवले होते कारण दोन कवींची कुस्ती, 'काजळमाया' पुस्तकावरील अन्याय, नाटयव्यावसायिकाची दु:खे, मराठी नाटयसमीक्षेचे भूतभविष्य या जीवनव्यापी गोष्टीइतके रेल्वेसंपाचे (आणि जॉर्ज फर्नांडिसचे) महत्त्व मला वाटत नव्हते. परंतु माझ्यासारख्या नसलेल्या अनेकांना ८ मे पासून २८ मे पर्यंत चाललेला वीस दिवसाचा अभूतपूर्व रेल्वेसंप ही भारताच्या इतिहासातली एक निर्णायक घटना वाटत होती.

भारताचा इतिहास आणि त्यातले एखाद्या घटनेचे (उदा. रेल्वेसंप) निर्णायकत्व आपल्या नारायणराव गोऱ्यांना जसे नेमके कळते तसे मला नाही कळत. त्यामुळे रेल्वे संप ही मला फारच फुटकळ घटना वाटली. तिचे एक वैशिष्टय मात्र मलाही जाणवले : ते असे की या रेल्वेसंपात दोन्ही बाजूंचा सारखाच प्रचंड विजय झाला. कॉंग्रेसपक्षाचा आणि विरोधी पक्षाचा विजय झाला; एल. एन. मिश्रा-कुरेशींचा आणि कामगार संघटनांचा विजय झाला; एकनिष्ठ कामगाराचा आणि संपनिष्ट कामगाराचा विजय झाला; बंद पडलेल्या गाड्यांचा आणि नवीन वेळापत्रकाप्रमाणे चालू राहिलेल्या गाड्यांचा विजय झाला; घरी बसलेल्या जनतेचा आणि तिची करमणुक करणाऱ्या आकाशवाणीचा विजय झाला; नोकऱ्या गमावलेल्यांचा आणि नोकऱ्या कमावलेल्यांचा विजय झाला; फारसे काही द्यावे न लागल्यामुळे देणाऱ्यांचा आणि फारसे काही घ्यावे न लागल्यामुळे घेणाऱ्यांचा विजय झाला. विजय दोन्ही बाजूंचा झाल्यामुळे, संप संपल्यावर, इंदिरा गांधी सिमल्याला हवा पालटायला निघून गेल्या आणि जॉर्ज फर्नांडिस हवा तयार करायला प्रांतोप्रांती भटकू लागला.

काम न करणे, त्याबद्दल पगार व बोनस घेणे, आणि तो वाढवून घेण्यासाठी संप करणे हे कामगाराचे मूलभूत हक्क आहेत, असे माझे मत आहे. त्यामुळे वीस लाख पीडित कामगारांच्या या उदात्त संपाला माझा संपूर्ण पाठिंबा होता. हे वीस लाख आणि मी एवढे सोडून उरलेल्या भारतीयांची या संपाबद्दल काय भूमिका होती हे निखालसपणे सांगता येणार नाही. एवढे कशाला, काही काही पत्रपंडितांना तर जॉर्ज फर्नांडिस (आणि डांगे) यांची या संपाबद्दल काय भूमिका होती हे निखालसपणे सांगता आलेले नाही. खुद्द जॉर्ज फर्नांडिस आणि डांगे यांना मात्र प्रस्तुत रेल्वेसंपाबाबतच्या आपल्या भूमिकेबद्दल कोणताही संदेह नव्हता हे त्यांच्या निश्चयी वागण्यावरून सहज लक्षात येऊ शकते. ◻


## ◻ स्टॅलिनला पुन्हा मान्यता

जोसेफ स्टॅलिनने रशियात कित्येक वर्षे कर्तुमकर्तुम सत्ता भोगली. सत्तेवर येताना विरोधकांचा त्याने समूळ नायनाट केला होता. स्टॅलिननंतर सत्तेवर आलेली क्रुश्चेव्ह-बुल्गॅनिन ही मंडळी थोडी उदारमतवादी होती. स्टॅलिनच्या रक्तलांछित कारकीर्दीशी असलेले आपले नाते त्यांना निकराने नाकारायचे होते. म्हणून त्यांनी स्टॅलिनचे स्मृतिरूप अस्तित्व पद्धतशीरपणे पुसून टाकण्याची कारवाई केली. त्यामुळे जोसेफ स्टॅलिन नावाचा एक अधिकारी पुरुष रशियात होऊन गेला, ही गोष्ट रशियात कल्पित मानली जाऊ लागली.

क्रुश्चेव्ह-बुल्गॅनिनची कारकीर्द संपली. रशियाला नवे नेतृत्व मिळाले त्यांना स्टॅलिनचा तेवढा तिटकारा नसावा. त्यामुळे स्टॅलिनविरोधी प्रचाराला त्यांनी आळा घातला. मात्र स्टॅलिनचा एकदम जयजयकार होऊ नये, याचीही काळजी घेण्यात आली. अलीकडे अशी काळजी घेण्याचीही गरज रशियन नेतृत्वाला वाटत नसावी : मॉस्कोमध्ये नुकतीच दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर 'वॉर' नावाची एक कादंबरी प्रसिद्ध झाली आहे. या कादंबरीत स्टॅलिनचे पवाडे गायले आहेत. कादंबरीकार आयव्हॅन स्टुडन्यूक रशियन राजवटीच्या पसंतीस उतरलेले साहित्यिक आहेत.

ईश्वर स्टॅलिनच्या आत्म्याला शांतीच देवो !

—अनंतराव



महमद करीम छगला
यांच्या
रोझेस इन डिसेंबर
या आत्मचरित्राचा
धावता परिचय

अनुवाद : विनय धुमाळे
लेखांक : एक

# असे हे रोझेस....

विनय धुमाळे

एखाद्या सुरेखशा सध्याकाळी बागेमध्ये गार्डन चेअर टाकून फुलाचा वास घेताना जो मूड असतो अगदी त्याच मूडमध्ये श्री. छगला यानी ' रोझेस इन डिसेंबर ' लिहिले आहे. आणि पुस्तक वाचल्यावर वाचकही त्याच मूडमध्ये जातो.

एका अत्यत प्रगल्भ आणि सुसस्कृत माणसाची जीवनकहाणी म्हणजेच श्री. महमद करीम छगला याचे आत्मचरित्र ' रोझेस इन डिसेंबर. '

एक राष्ट्रवादी राजकारणी, एक अत्यत मुरब्बी वकील, मुबई हायकोर्टाचे सरन्यायाधीश, आतरराष्ट्रीय कोर्टाचे न्यायाधीश, भारतीय मत्रीमडळातले एक सभासद या नात्याने त्यानी अनेक जागा भूषविल्या. त्यामुळे छगलाची आत्मकहाणी केवळ श्री. छगलापुरतीच मर्यादित न राहाता भारतीय समाजघटनाची एक सुरेखशी चित्रमालिकाच बनते. पुस्तकाचा काळ जो आहे तो अक्षरश. प्रचडच आहे. अगदी त्याच्या लहानपणापासून ते परवा परवापर्यंतच्या बागलादेशसारख्या घटनाचे पडसाद आपल्याला या पुस्तकात वाचायला मिळतात. परतु सुरेख प्रवाही भाषा व अत्यत वाहते असे प्रसग त्यामुळे पुस्तक ढगदार असे झाले आहे

अनेक व्यक्तीपरिचय, ढगदार प्रसगाचे अत्यत रगतदार वर्णन, रोचक भाषा, प्रसगाचे विवेचन करणारी खास छगला दृष्टी, या सगळ्यामुळे ' रोझेस ' केवळ अनोखे झाले आहे. आयुष्याच्या सध्याकाळी कुठल्याही घटनावरती विकारवश न होता पेश केलेले हे रोझेस अत्यत सयमित आहत. कुठेही त्याला भडकपणा नाही. भडक रगही नाही की दर्पही नाही. पण पारपरिक गुलाबाची जी एक शान असते ती मात्र छगलाच्या रोझेसमध्ये पुरेपूर आहे.

आत्मचरित्रासारख्या प्रकारात साहाजिकच कथन करणाऱ्या ' मी 'ला पुष्कळ महत्त्व असते, पण पुष्कळ वेळेला सामजस्याच्या अभावामुळे पुस्तकातला ' मी ' मागे पडून लेखकाचाच ' मी 'पणा पुढे यायला लागतो. आणि अनेकदा आपण पाहातो की ' मी ' व ' मी 'पणा मधली रेषा अस्पष्ट होत जाते पण या पुस्तकात मात्र छगलानी ' मी ' केवळ निमितमात्र म्हणून वापरले आहे. छगलाचे सामजस्य व कल्चर्डनेस सर्वस्थातच आहे. हे पुस्तकही त्याला अपवाद नाही. छगलांचे वेळोवेळी अनेक लोकाशी सबध आले. आता व्यक्ती तितक्या प्रकृती आणि सामाजिक जीवनात काही वेळा दोन व्यक्तिची तुलना अपरिहार्य ठरतेच. सत्य लिहूनही ज्या चलाखीने आणि सफाईने छगलानी असे प्रसग हाताळले आहेत त्यामुळे सहसा कुणीही नाराज होणार नाही. अथवा दुखावला जाणार नाही, कारण छगलाचा दृष्टीकोणच मुळी पॉझिटिव्ह आहे.

श्री. छगला हे कायदेआझम महमदअली जीना याचे एकेकाळचे सहकारी. त्यामुळे या पुस्तकात जीना या व्यक्तीवर देखील पुष्कळ प्रकाश पडतो. एका अत्यत बुद्धिमान माणसाचा राष्ट्रीयत्वाच्या एका टोकापासून ते राष्ट्रविभाजन करण्याइतपतच्या दुसऱ्या टोकाचा प्रवासही आपल्याला याच पुस्तकात (जीनारूपाने) वाचायला मिळतो. पुस्तकाला खास अशी माडणी नाही आहे. अनेक व्यक्ती, त्याचे वैचित्र्यपूर्ण स्वभाव व त्यावर छगलाची मिस्कील नजर यामुळे प्रत्येक प्रसग कसा जिवत वाटतो.

एनव्हरायटीचे हायकोर्टातले किस्से असोत वा जीनाच्या लग्नाची हकीगत असो की दलाईलामाच्या ब्रेकफास्टची गोष्ट असो या साऱ्या गोष्टी त्यानी एखाद्या कसबी गोष्टीवेल्हाळाप्रमाणे रगवल्या आहेत.

मूलभूत तत्त्वाबाबतचा त्याना वाटणारा आदरही आपल्याला याच पुस्तकात दिसून येतो. पण ठराविक राजकारणी भोगळपणापासून दूर राहण्याची त्याची वृत्ती देखील क्षणार्धात आपल्या ध्यानात येते.

त्याच्या लिखाणात, वृत्तीत, अभिनिवेश जरूर आहे पण क्षुद्र आकस मात्र नाही. स्वत च्या तत्त्वप्रणालीसाठी ते हिरीरीने झगडले पण झगडताना त्याच्या विवेकाचा तोल कधीच सुटला नाही. दुसऱ्या टोकावरच्या माणसाला जाणून घ्यायचे त्याचे सामजस्य सदैव जागृतच राहिले.

' रोझेस ' वाचल्यानतर या शालीन, सौजन्यशील माणसाला भेटावे असे आवर्जून वाटायला लागले भारतीय विद्याभवनाच्या ऑफीसमध्येच बसलो होतो. समोरच्या टेबलावरच्या सुदेशन का कोणी मला सुचवल, ' तुम्ही प्रत्यक्ष घरीच जाऊन या की. ' छगला आणि माझी भेट घेतील ? क्षणभर माझी मलाच गमत वाटली व केवळ तारुण्य सुलभ धाडसाने मी त्याना फोन लावला. ते सौजन्यमूर्ती आहेत हे वाचल होत, ऐकल होत पण प्रत्येकाचे खाजगी जीवन ते वेगळेच. इतक्यात दुसऱ्या बाजूने कोणीतरी बोलले. मी म्हणालो, ' मे आय स्पीक टु ऑनरेबल मि. छगला. ' प्रत्यक्ष तेच फोनवर होते. धडधडत्या स्वरात तसाच बोललो, ' मला तुम्हाला भेटायच आहे, ' रोझेसच्या अनुषगाने '. लगेच मृदू स्वरात उत्तर आल की उद्या सकाळी दहा वाजता या. आणि पुढे त्यानी मलाच विचारलं, ' विल दॅट बी कन्व्हनिइंट टु यू ?' कुलाब्याला दुसऱ्या दिवशी त्याच्या निवासस्थानी गेलो. क्षणार्धात छगला बाहेर आले. अत्यत आस्थेने त्यानी माझी चौकशी केली.

मी त्याना विचारले की, ' रोझेस वाचकाना इतक आवडेल अस तुम्हाला वाटल होत का ?' त्यानी सागितले, की ' कुठल्याच लेखकाला आपल्या पुस्तकाच स्वागत वाचकाकडून कस होईल हे ठाऊक नसत. माझ्या ' रोझेस 'ला जो एक प्रचड उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, मला लोकानी जो चागुलपणा दाखवला त्याने माझे श्रम मात्र वाया गेले नाहीत अस मला वाटत. त्या स्तुतीसुमनाना मात्र मी पात्र आहे अस वाटत नाही. '

त्यानतर मी त्याना भारतातल्या सद्यस्थितीबाबत विचारले. ते म्हणाले, ' आजकाल जे काही घडत आहे त्याबद्दल मी फार अस्वस्थ व व्यथित आहे. मला वाटत आपण एका ज्वालामुखीच्या तोडावर बसलो आहोत आणि ज्याचा विस्फोट व्हायला सुद्धा सुरुवात झाली आहे. पण मी निराश मात्र नाही. आपला देश हा महान आहे. त्याची सस्कृतीही थोर आहे इग्रजीमध्ये एक म्हण आहे की ' व्हेन द नाइट इज डार्केस्ट द डॉन इज नॉट फार ऑफ ' जरी सुखदायक भविष्याची पहाट मला पाहता आली नाही तरी माझी मुलं-नातवड मात्र ती जरूर पाहातील. '

त्यानतर मी त्याना विचारले, ' नैतिक मूल्यांची आपल्याकडे इतकी कमी असताना लोकशाही आपल्याला योग्य ठरेल का ?' त्यावर ते म्हणाले, ' लोकशाही सरकार चालवायच म्हणजे अत्यत कठीण गोष्ट आहे. त्याला शिस्त, चारित्र्य व उच्च दर्जाची सामाजिक नीतिमत्ता आवश्यक असते. मला म्हणायला वाईट वाटत परतु या गोष्टीची आपल्याकडे दुर्दैवाने फारच वाण आहे जोपर्यंत आपण आपल्या शिक्षणपद्धतीत मूलभूत बदल करीत नाही आणि हे गुण मुलावर लहानपणापासून बिंबवीत नाही तोपर्यंत लोकशाहीचे भवितव्य मला वाटत फारच निराशाजनक आहे.
यानतर मी त्याना नेहमीच्या खास खुर्चीत बसण्यास सागितल व म्हणालो की, ' मला फोटो हवे आहेत तुमचे. ' क्षणार्धात मिस्कीलपणे पण मोठ्या गभीरपणे त्याली मला विचारल–
' सो यू वॉंट मी टू लुक इटेलिजट '

एकूण काय, त्याच्या हायकोर्टाच्या निरोप समारभाच्या वेळी सध्याचे सुप्रीप कोर्टाचे न्यायमूर्ती श्री. चद्रचूड म्हणाले तेच खर.

' whatever else I may say today, I shall have to answer the silent reproach of my conscience that I am inferior to my subject. I only seek solace in the thought that the unsung melodies are sweeter because they are like songs without words. '

तर असे हे छगला व अस हे त्याचं रोझेस इन डिसेबर. भारतीय राजकारणाचा गेल्या ५० वर्षातला कल समजावून घ्यायचा असेल तर हे पुस्तक अवश्य वाचल पाहिजे. मनुष्य अत्युच्चपदीही किती विनम्र राहू शकतो हे बघायच असेल तर हे पुस्तक वाचलच पाहिजे. रोझेस हे गेल्या सात-आठ वर्षांमधले एक लक्षात राहाण्यासारखे पुस्तक आहे यात शकाच नाही. ¤

खरं म्हणजे माणूस आत्मचरित्र का लिहितो? मला वाटतं आत्मचरित्र लिहायच्या आधीच या प्रश्नाचं उत्तर स्वत.शी तयार असल पाहिजे. माणूस आत्मचरित्र लिहितो ते स्वत.चंच स्वत.पाशी समर्थन करण्यासाठी लिहितो, की स्वतःच समकालीनापाशी समर्थन करण्यासाठी लिहितो की भविष्यात देखील स्वत.च समर्थन व्हाव या इच्छेने लिहितो. तस पाहिलं तर हा सारा प्रकार मानवी लोभापैकीच आहे. मानवी लोभाचाच तो एक भाग आहे. स्वत:चं कर्तृत्व लोकानी विसरावं अस कोणालाही वाटत नसत. माणसाची स्मृती तशी फारच तोकडी असते. त्यामुळे दोन कव्हर्समधली छापील अक्षरच 'अक्षर' ठरण्याचा संभव असतो. नाही म्हणायला व्यक्तीवरील मृत्युलेखाने व्यक्तिच्या कार्याचे बक्षीस त्याला मिळत असते. पण तो लेख वाचायला सुदैवाने अथवा दुर्दैवाने ती व्यक्ती हयात नसते. माझ्या जन्मतिथीपासून सुरुवात करून आयुष्यातल्या प्रत्येक घटनेची वाचकाला सुसगतवार माहिती करून देता येईल. पण मला वाटतं ती पद्धत फारच कटाळवाणी होईल. हे सार व्हिक्टोरिअन जमान्यात शोभल असतं.

अनेक चरित्रे व आत्मचरित्रे वेगवेगळया शैलीत लिहिली गेली आहेत. अगदी अलिकडचच म्हणजे प्रख्यात फ्रेंच लेखक आद्रे मॉलरों याचे आत्मचरित्र 'अँटी मेमॉयर्स.' मॉलरॉंची पद्धत कालसगतीला महत्त्व देण्यापेक्षा विषयाला महत्त्व देणारी आहे. एखाद्या घटनेच्या अथवा व्यक्तीच्या अनुषगाने ते आपल्या पूर्व स्मृती गुफतात. एका व्यक्तीवरून ते लगेच दुसऱ्या व्यक्तीकडे वळतात. एका भौगोलिक खंडातून ते सहजगत्या दुसऱ्या खडात उडी मारतात. त्यात लॉजिकल असा काही सिक्वेन्सच नसतो.

खरं तर लॉर्ड मोर्ले यानी लिहिलेल्या आठवणीनी मला प्रभावित केलं होत त्याच्याच दुसऱ्याही एका पुस्तकाने मला तेवढच मोहित केलं होतं. ते म्हणजे त्यानी लिहिलेले ग्लॅडस्टनचे चरित्र. या चरित्रात केवळ ग्लॅडस्टनचीच महती नव्हती तर त्याच्या अनुषंगाने इग्लडचा सारा इतिहासच जणू त्याने अत्यत जिवतपणे माडला होता. हे चरित्र वाचताच बालसुलभ बुद्धीने मला सुद्धा ग्लॅडस्टन जेथे शिकला त्या ऑक्फर्डमध्ये शिकायची ओढ लागली. त्याच्याच प्रमाणे आपणही सार्वजनिक कार्यात भाग घ्यावा, पार्लमेंटमध्ये वादविवाद करावा अस तीव्रतेने वाटू लागलं. तस बघायलाच जर गेल तर या 'लाइफ ऑफ ग्लॅडस्टन 'ने माझे भविष्यच जणू बदलले. मी व्यापारी कुटुबात जन्मलेला आणि त्यामुळे मी कॉमर्सकडे जाणं हे जास्त सयुक्तिक होत. कायदा अथवा राजकारणाशी आमच्या घराण्याचा दूरान्वयानेही सबध नव्हता. पण मी हे ग्लॅडस्टनच चरित्र सस्कारक्षम लहान वयात असताना वाचल. त्यामुळे मला वाटत माझ्या आयुष्याला वेगळ वळण लागल. एक मात्र मी ठरवल होत की सार्वजनिक कार्यात जर भाग घ्यायचा असेल तर इतिहासाची ओळख ही हवीच. त्यामुळे मी ऑक्सफर्डमध्ये मॉडर्न हिस्टरी हा विषय घेतला. पण याच्यावद्दल मी पुढे सागेनच.

आत्मचरित्र का लिहावे याच्यावरून मी इथपर्यंत आलो. मला वाटतं आत्मचरित्र लिहिण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे स्वत.च्या स्मृती 'अविस्मरणीय' करणे. ज्या घटनांनी माणसाच्या अस्तित्वाला अर्थ व ऊब दिलेली असते त्याना अक्षर करणे. ज्यावेळी भविष्याचे वेध लागायचे बंद होतात, साऱ्या ऐहिक आशाआकांक्षा दूर गेलेल्या असतात, कशाचीच क्षिती नसते त्याचवेळी या आठवणीचं समालोचन करणं सयुक्तिक. त्यातही मानवी स्वार्थानुसार आपण जतन करतो त्या फक्त सुखदायी आठवणी. त्याचमुळे तर आयुष्याच्या शिशिरात देखील आठवणीच्या गुलाबाचा सुगंध आपण घेऊ शकतो.

### एकाकी, रुक्ष, बालपण

सहसा लोकांचा बालपण रम्य करण्याकडे कल असतो पण माझ्या बाबतीत मात्र तसं काहीच झालं नाही. वयाच्या पाचव्या वर्षीच माझी आई गेली. त्यामुळे अत्यंत एकाकी अवस्थेतच मी वाढलो. एकट्यानेच भविष्याची स्वप्ने पाहिली. माझ्या स्वतःच्या विश्वात मी एकटाच होतो, एकाकी होतो.

माझ्या आईचा मृत्यू हा मला बसलेला एक जबरदस्त धक्का होता. जरी त्याबद्दल मी वरकरणी कधीच बोलून दाखवले नाही तरी माझ्यातले काही तरी मौल्यवान हरवले आहे, नाहीसं झालं आहे याची मात्र मला सारखी जाणीव होत होती. अजूनही मला सारं कस स्पष्ट आठवत. माझी आई मरताक्षणीच मला जवळच्याच एका माझ्या मावशीकडे नेण्यात आल. त्या सगळ्यांना माझी आई गेली आहे हे माझ्यापासून लपवून ठेवायचं होतं. पण अगदीच जरी मी लहान असलो तरी भयकर काहीतरी घोटाळा झाला आहे एवढं मात्र मला उमगल होतं. आणि अगदी आजही त्यावेळी आईचे शव नेताना पुकारलेली अल्ला हो अकबरची अतिभीषण साद स्पष्टपणे मला आठवते.

यानंतर मला कलकत्त्याला नेण्यात आलं. पण तिथल्या शाळेतही मी खास अशी काही प्रगती करू शकलो नाही. माझ्या आईच्या मृत्युने मला खोलवरच धक्का पोहचवला होता. जेव्हा आम्ही कलकत्त्याहून परत आलो तेव्हा आम्ही मुबई शहराच्या भरवस्तीतून दादर नावाच्या उपनगरात रहायला आलो. आता दादर अगदी दुथडी भरून वाहात आहे, पण त्याकाळी साधारण १९०६ अथवा १९०७ च्या काळी दादर खेडेवजा उपनगरापैकीच एक होत.

ज्या शिक्षणाने माझ्यावरती पुढे एवढा प्रभाव केला त्या माझ्या शैक्षणिक श्रीगणेशाची सुरुवात मी दादरमध्येच केली. मी त्या वेळी दादरच्या अँटोनिओ डिसिल्व्हा शाळेत शिकत होतो. ती शाळा कॅथॉलिकाची असल्याने दररोज सकाळसध्याकाळ तेथे प्रार्थना होत असे. त्या ख्रिश्चन प्रार्थनेला कॅथॉलिक मुले प्रार्थना म्हणून साथ देत तर इतर मुले केवळ उभी रहात. एकदा दुपारी वर्ग चालू व्हायच्या अगोदर मी एक पुस्तक अगदी तल्लीनतेने वाचीत होतो आणि त्या नादात प्रार्थनेला उभे राहायचे आहे हे विसरूनच गेलो. प्रार्थना सपल्यावर शिक्षकानी मला बोलावले, मला हात जोडायला सागितले व माझ्या बेशिस्त वागणुकीबद्दल चागले चार सहा फटके हातावर मारले. साहजिकच माझ्यासारख्या शिस्तप्रिय, एकलकोड्या, हुशार मुलाला मारल्याबद्दल माझे वर्गबंधू चांगलेच खूश झाले. पण मला मात्र राहून राहून असे सारखे वाटत होते की, शिक्षा करायच्या आधी त्या शिक्षकाने किमान मला विचारायला तरी पाहिजे होते. मला त्याच्या प्रार्थनेचा काही जाणून बुजून अपमान करायचा नव्हता.

यानतर गमतीची गोष्ट अशी की, बऱ्याच वर्षांनी भारतसरकारचा शिक्षणमत्री म्हणून मी याच शाळेत कसल्यातरी बक्षीस समारंभाला

प्रमुख पाहुणा म्हणून उपस्थित होतो. त्याच वेळी थोडेबहुत विषयांतर करूनदेखील मी ही गोष्ट सांगितली आणि आश्चर्याची गोष्ट अशी की, ज्यांनी मला शिक्षा केली होती ते माझे शिक्षक पण त्या वेळी हजर होते. एखाद्या शिक्षेमुळे एखाद्याचा स्वाभिमान दुखावला जातो हे कबूल. पण त्याच वेळी काही नियम हे पाळलेच पाहिजेत हेसुद्धा उमजते.

## लो. टिळक आणि जीना

माझ्या शालेय जीवनातली दुसरी अगदी खास आठवणारी गोष्ट म्हणजे लोकमान्य टिळकांची. लो. टिळकांसारख्या एका पुढाऱ्याला एका भारतीय जज्जानेच ६ वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा फर्मावली. न्यायमूर्ती दावर यांच्या या निकालाने मी अत्यंत प्रक्षुब्ध व अस्वस्थ झालो. आपणसुद्धा काहीतरी केले पाहिजे असे वाटायला लागले. त्याच वेळी वरील घटनेमुळे दादर, परळ भागात दंगली उद्भवल्या. साहजिकच माझ्या सहानुभूती दंगलखोराकडे होत्या. त्या वेळी मी भारतीय पोशाख घालून शाळेत जात असे. साहजिकच माझ्या घरच्यांना वाटले की, मला या पोशाखात पाहून पोलीस मारपीट करतील. त्यामुळे घरच्या लोकांनी मी इंग्रजी पद्धतीचा पोशाख घालून जावे म्हणून पुष्कळ समजावले. पण माझ्यात पुरेसा स्वाभिमान होता. मी भारतीय वेशातच शाळेला जाईन म्हणून हट्ट धरला आणि भारतीय वेशातच शाळेत गेलो. सांगायला नकोच की मला काहीसुद्धा झाले नाही.

बऱ्याच वर्षांनी टिळकांना बघायला म्हणून मी हायकोर्टात गेलो. टिळकांच्या वरील शिक्षेविरुद्ध केलेल्या अपिलाचा आज निर्णय होता. निकाल जस्टीस बॅचलर व जस्टीस शहा देणार होते. मी लवकरच हायकोर्टात गेलो. थोड्याच वेळात लो. टिळक आले व दुसऱ्या रांगेत येऊन बसले. टिळकांची ही केस जिनांनी चालवली होती. थोड्याच वेळात जिनाही आले व वकिलासाठी असलेल्या पहिल्या रांगेत बसले. लगेच निकालपत्राचे वाचन सुरू झाले व न्यायालयाने टिळकांना निर्दोष म्हणून जाहीर केले. साऱ्यानाच अतोनात आनंद झाला. जिनांनी वळून मोठ्या प्रेमाने टिळकांशी हस्तांदोलन केले.

पुढे मी इतकी वर्षे जिनांच्या सहवासात होतो पण वेळोवेळी जिनांच्या मनात असलेला टिळकांविषयीचा प्रकांड आदरच मला दिसून आला. जिना गांधीजी वा नेहरू यांच्यासंबंधी कटू बोलत असत पण टिळक व गोपालकृष्ण गोखले यांच्याबद्दल मात्र त्यांच्या मनात अथांग आदरच होता.

जिनांनी मला सांगितलेली ही आठवण : न्यायमूर्ती दावरांनी लोकमान्यांना सहा वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा फर्मावल्यानंतर जणू काय बक्षिसी म्हणून ब्रिटिश सरकारने न्या. दावरांना नाइटहूडचा किताब बहाल केला. या सन्मानार्थ म्हणून इथल्या वकीलवर्गाने न्या. दावरांना मेजवानी देण्याचे ठरवले व त्या धर्तीचे सर्क्युलरही सर्वांकडे फिरू लागले. जेव्हा जिनांकडे हे सर्क्युलर आले तेव्हा जिनांनी खरमरीत शब्दात त्याला पुष्टी जोडली. त्यांनी लिहिले की, ज्याने एका महान देशभक्ताला सहा वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा फर्मावली आहे त्याला मेजवानी देण्यात येथल्या वकीलवर्गाला शरम वाटली पाहिजे. न्यायमूर्ती दावरांना हे कळले. त्यांनी जिनांना बोलावले व विचारले की, दावर जिनांशी कधीतरी वाईट वागले होते का? साहजिकच जिनांनी नकारार्थी उत्तर दिले. त्यानंतर दावरांनी विचारले की, त्यांच्याविरुद्ध जिनांची काही तक्रार होती का? त्यालाही जिनांनी नाही म्हणून सांगितले. मग दावरांनी जिनांना विचारले की, एवढी खरमरीत नोट मग तुम्ही का लिहिलीत? तर जिनांनी त्यांना सडेतोड शब्दात सुनावले, 'व्यक्तिशः तुम्ही मला जरी चांगले वागवले असले तरी ज्या पद्धतीने तुम्ही टिळकांची केस हाताळली आहे ती पद्धत अत्यंत संतापजनक आहे.' या साऱ्या प्रकारामधून जिनांच्या मनातला टिळकांच्याविषयीचा आदर आपल्याला दिसून येतो.

बऱ्याच वर्षांनी सुदैवाने माझा या खटल्याशी मोठ्या गमतीशीरपणे संबंध आला. ज्या कोर्टात लो. टिळकांची केस चालली होती त्याच्याबाहेरच सुवर्णाक्षरांनी काही शब्द कोरले गेले. टिळकांनी वरील खटल्यात जे बचावाचे भाषण केले होते त्यातलाच एक उतारा सेंट्रल हॉलबाहेर सुवर्णाक्षरांनी कोरला गेला व मुंबई हायकोर्टाचा सरन्यायाधीश म्हणून त्यावेळी मी भाषण केले. त्यावेळी मी म्हणालो, 'या कोनशिलेचे अनावरण करण्याएवढा दुसरा कुठलाच मान मला आयुष्यात मिळणार नाही. मी पुढे म्हणालो, ज्या कालीम्याने आजवर हायकोर्टाला ग्रासले होते, तो नाहीसा करण्याचा आजचा हा प्रयत्न.' मी मोठ्या अभिमानाने सांगितले की, 'आज एक भारतीय मनुष्य स्वतंत्र भारतात सरन्यायाधीशाची जागा भूषवीत आहे, त्याचे श्रेय पुष्कळ अंशी टिळकांच्या हालअपेष्टांना व त्यागाला आहे.'

माझ्या या वागणुकीवर काही लोकांनी टीका केली. पण मला वाटतं मी योग्य तेच केलं.

जाता जाता एक लहानशी आठवण. मी जेव्हा ऑक्सफर्डमध्ये शिकत होतो तेव्हा मी टिळकांना भेटायला गेलो होतो. मला वाटतं चिरोलसाहेबांच्या खटल्याच्या निमित्ताने टिळक लंडनला आले होते. मी त्यावेळी अगदीच अनभिज्ञ होतो. फारच तरुण होतो. तरीही मी त्यांना जेव्हा भेटलो तेव्हा त्यांनी अत्यंत आपुलकीने माझे स्वागत केले. त्यावेळी काय बोललो हे आठवत नाही पण बाहेर आलो तो एक प्रेमादराची भावना घेऊनच.

टिळक द्रष्टे होते. तरीही त्यांच्या स्वभावाला खास व्यवहारीक अंगही होते की जे सहसा द्रष्टे लोकांत दिसत नाही.

टिळकांना मी भेटलो त्यावेळी मी ऑक्सफर्डमध्ये शिकत होतो. इंग्लंडमध्ये त्या काळी शैक्षणिक क्षेत्रातले अत्युच्च शिखर म्हणून ऑक्सफर्डकडे बघितले जात होते. तुम्ही ऑक्सफर्डमध्ये प्रवेश करताक्षणीच प्रबुद्ध आहात असं मानण्यात येतं. विद्यार्थ्याला फक्त रस्ता वा मार्ग दाखवण्यात येतो. बाकीचं त्यांनी सर्व स्वतःच स्वतः करून घ्यायचं असतं. ऑक्सफर्डची एक विशेष गोष्ट म्हणजे दर आठवड्याला एक निबंध लिहावा लागत असे. मी ऑक्सफर्डमध्ये प्रवेश करता क्षणीच ऑक्सफर्ड युनियनमध्ये सामील झालो. ऑक्सफर्डची वादसभा ही जगातल्या काही श्रेष्ठ वादसभांपैकी आहे. इंग्लंडच्या कित्येक पंतप्रधानांनी आपल्या भावी कारकीर्दीची उमेदवारी या वादसभेमध्येच केली आहे. वादसभा दर गुरुवारी रात्री ९॥ वाजता भरायची आणि कित्येक अंडरग्रॅज्युएट्स बरोबर इंग्लंडमधल्या प्रतिष्ठीत व्यक्तीही याला हजर असायच्या. कित्येक वेळेला प्रत्यक्ष पंतप्रधानही या वादसभांना उपस्थित रहायचे. आणि तो एक मान

असायचा. या सर्व वादसभांना मी अत्यंत नियमितपणे व अक्षरशः भाविकतेने हजर रहायचो.

## ऑक्सफर्डचा निरोप

तिथे ऑक्सफर्ड इंडीयन मजलीस देखील कार्य करीत होती. यात अनेक वेळेला प्रक्षोभक भाषणे होत. भारतातल इंग्रजी सरकार उलथून टाकलं पाहिजे, स्वातंत्र्य लवकरात लवकर प्रस्थापित केलं पाहिजे या धर्तीची साधारण भाषण असत. मी साधारणत. मवाळ राजकारणी आहे असा तेथे समज होता. पण शक्यतेच्याच राजकारणावरती माझा विश्वास असल्याने माझी भाषणं सहसा मवाळ पद्धतीचीच असत. मजलीस कामकाज आम्ही 'वंदे मातरम्' ने सुरू करीत असू. माझ्या मते वंदेमातरम हे एक अद्वितीय असं हृदयस्पर्शी गीत आहे एका अर्थाने ते थोडसं दु:खी गाणं आहे. आणि जेव्हा चांगल्या रितीने ते आळवल जात तेव्हा तर मला ते गलबलून टाकत. हृदयात कोठेतरी कालवाकालव होते. 'वंदे मातरम्' त्या काळी राष्ट्रगीत नव्हत कारण त्यात भविष्यातल्या स्वतंत्र भारताचे वर्णन होते. त्यावेळी अजून आपण पारतंत्र्यातच होतो. कामकाजाच्या शेवटी आम्ही कवी इक्बाल यानी लिहिलेले 'सारे जहासे अच्छा' म्हणत असू. हे त्यानी राष्ट्रभक्तीच्या काळात लिहिलेले गीत. जेव्हा त्यानी राजकारण बदलल व आत्यतीक जातीयवादी झाले तेव्हा नव्या श्रद्धांना अनुसरून त्यानी गीताच्या पहिल्या दोन ओळी पाकिस्तान करता म्हणून बदलल्या.

याचवेळी वकिली करायची हे निश्चित ठरवून मी 'इनर टेंपल' मध्ये नाव घातलं व त्याकरता दर टर्मला मला लंडनला या टेंपलमध्ये तीन जेवणे घ्यावी लागत. साधारणत: या टेंपलमध्ये इतराना सहा जेवणे घ्यावी लागत. पण ऑक्स्फर्ड वा केंब्रीजच्या विद्यार्थ्यांना तीन जेवणेच घ्यावी लागत ही एक ब्रिटीश लोकजीवनाची खास पद्धत.

वकिलीच्या क्षेत्रात शिरण्यासाठी इनर टेंपल हा एक राजमार्ग आहे त्यात काहीच शंका नाही.

मी ऑक्सफर्डमध्ये शिकत असतानाचीच एक तोंडी परीक्षा माझ्या अगदी पक्की स्मरणात आहे. युरोपियन हिस्टरीचा पेपर लिहिला होता व त्यात मी इटालीचा नकाशा काढला होता प्रश्नोत्तराच्या वेळी प्राध्यापकानी माझा तो नकाशा माझ्यासमोर ठेवला व अत्यत शांतपणे विचारले, 'छगला, हा नकाशा इटालीचाच आहे ना?' त्याच्या विचारण्याच्या पद्धतीवरून मला कळून चुकले की, नकाशामध्ये काहीतरी जबरदस्त घोटाळा झाला आहे. मी हळूच खालमानेने नकाशात पाहिले आणि हाय! काय पण मी नकाशा काढला होता. इटालीच्या अनेक संस्कृत्याची जणू मी वाताहात केली होती. त्यामुळे प्राध्यापकांच्या प्रश्नाला शक्य तेवढ्या बारीक आवाजात मी उत्तर दिले, 'हो.' ते साल होते १९२२ व दोन चारच महिने अगोदर इटालीमध्ये धरणीकंप झाला होता. क्षणार्धात प्राध्यापकानी विचारले, 'छगला, हा तुमचा इटाली भूकंपाच्या आधीचा की नंतरचा?' अक्षरश. धरणी दुभंगून मला पोटात घेईल तर बरे अशी माझी स्थिती झाली होती.

तर असं हे ऑक्स्फर्ड.

अत्यत भरल्या अत:करणाने मी ऑक्स्फर्डचा निरोप घेतला. ऑक्स्फर्डने माझ्यात आत्मविश्वास निर्माण केला होता. जिद्द निर्माण केली होती. आल्या प्रसंगाला तोंड द्यायचा विश्वासदेखील मी येथेच कमावला होता.

मला कळून चुकले होते की, आता माझे तारुण्यसुलभ आयुष्य संपत आले होते. प्रत्यक्ष अडचणींशीच आता मला सामना करावा लागणार होता काळजी, चिंता आता मागे लागणार होती. हौसमौजेचे दिवस आता संपले होते. मला पाहिजे तसे आयुष्य यापुढे घालवायला मिळणार नव्हते. तर जसे आहे तसे त्याला मला तोंड द्यावे लागणार होते. ऑक्स्फर्डच्या माझ्या शेवटच्या रात्री मॅगडलेन पुलावरून चंद्रप्रकाशात मी ऑक्स्फर्डची उन्नत शिखरे पाहिली आणि शतकानुशतकांचे ते जुने भावविश्व मला आणखी शिकण्याकरताच जणू खुणावत आहे असे वाटले. मी तशाच अवस्थेत ऑक्स्फर्डचे सौंदर्य आकंठ प्यायलो आणि मला अमूल्य असे काहीतरी दिलेल्या त्या ज्ञानविश्वाचा निरोप घेतला.

## आणि हायकोर्टात प्रवेश

इनरटेंपलमधल्या कायद्याचे ज्ञान गाठीशी बाळगून मी मुंबई हायकोर्टात वकिली चालू केली. त्या वेळी मुंबईचा वकीलवृंद साऱ्या भारतातच प्रख्यात होता. त्यांच्यातल्या काही निवडक व्यक्तीविषयी मी काहीतरी सांगायलाच हव. पण हो, त्या आधी माझा कोर्टातला पहिला दिवस...

धडधडत्या अंत.करणाने व भयभीत मनाने मी हायकोर्टच्या परिसराचा अदमास घेतला. लगेच त्या वेळेला मला काम देण्याचा मूर्खपणा कुठल्याही सॉलीसिटरने केला नसता व प्रत्यक्षात केलाही नाही. बऱ्याच वर्षांनी त्यांचा माझ्यावरती विश्वास बसला.

त्या काळी वकिली करण्यातले एक अग्रगण्य म्हणजे एन व्हरायटी. त्याच्याबद्दलची श्री. भुलाभाई देसाईंची हकीकत फारच गमतीशीर आहे. एकदा कुठल्यातरी कामाची तयारी करीत असताना कोर्टाच्या व्हरांड्यात भुलाभाई काहीतरी लिहून घेत होते. इतक्यात एन व्हरायटी तिकडून जात होते. त्यांनी ते पाहिले. ते जवळ आले आणि भुलाभाईंच्या साऱ्या नोटस फाडून फेकून दिल्या व जाता जाता त्यानी भुलाभाईंना सल्ला दिला, "जरा स्वत च्या स्मरणशक्तीचाही उपयोग करायला शिका." त्यानतर कितीही किचकट काम असो, भुलाभाईंना लिहून म्हणून कधी घेताना मी पाहिले नाही. ज्या एन व्हरायटीनी हा सल्ला भुलाभाईंना दिला तेही तसे स्मरणशक्तीच्या बाबतीत अफाटच होते. ते दिसायला तितकेसे प्रभावी नसले तरी त्यांची बुद्धिमत्ता अगाध होती. प्रत्येक मुद्द्याचा केवळ पाननंबरच नव्हे तर त्या पानावरील बारीक सारीक नावे व आकडेसुद्धा त्यांच्या सहज लक्षात रहात.

मला आठवत, त्या वेळी जमशेटजी कांगा सरकारी वकील होते. आणि त्याच वेळी त्यानी मुबईला येणाऱ्या सिव्हिल जस्टीस कमिटीच्या सदस्याकरता एक खास स्वागतसमारंभ आयोजित केला होता व त्याची अगदी तीव्र इच्छा होती की, मुबईचे भूषण एनव्हरायटीनी सगळ्याची भेट घ्यावी. एनव्हरायटी या गोष्टीला कबूल झाले. मात्र त्याच्या स्वभावाला अनुसरून त्यानी एक अट मात्र घातली. ते म्हणाले, 'मी सकाळपासून संध्याकाळपर्यंत ब्रिज खेळेन व मगच या मेंबरलोकांची गाठ घेईन." या गोष्टीला कांगाही तयार झाले. कांगा म्हणजे वकीलवर्गाचे पुरुषसिंह, पण त्यांनीही खास एनव्हरायटीकरता ११ वाजता ब्रिजचा डाव ठरवला. चौथे पार्टनर कोणी गुप्ते म्हणून

होते. तेही अगदी लांब रहाणारे. बराच वेळ झाला गुप्ते काही आले नाहीत. त्यामुळे मला एनव्हरायटींचा पार्टनर म्हणून बसावं लागलं व त्याचा फटकाही मी खाल्ला. होता होता संध्याकाळ झाली. कांगांनी हळूच येऊन एनव्हरायटीना त्या मेंबरांची भेट घेण्यास्तव विनती केली. तर नेहमीच्या धुंदीत, ब्रिज खेळत असतानाच ते गुरकावले, 'कॉल दोज जॉनीज हिअर.' 'त्यांना मला भेटायचं असेल तर इथं आणा त्यांना.' अगदी त्यांच्याच इच्छेनुसार एकेक मेंबर शांतपणे आत आला व त्यांची गाठ घेऊन पावन होऊन गेला. असं त्याचं वकिलीचं वैभव. असा त्यांचा ज्ञानाचा रुबाब. एनव्हरायटीच्यानंतर नाव घेण्यासारखा दुसरा वकील म्हणजे स्ट्रँगमन. पण तो फारच उद्धट होता. उद्धट जरी होता तरी तो एक अप्रतिम वकील होता यात शकाच नाही. त्यानंतर नाव घेण्यासारखे वकील म्हणजे चिमणलाल सेटलवाड व कन्हैयालाल मुन्शी...आणि अर्थात जीना. त्या काळी जीना हे वकिलीच्या अत्युच्च शिखरावर होते. ते एक निष्णात वकील होते. त्यांची उलटतपासणी तर बिनतोड असे.

माझी व जिनांची तशी जुनी ओळख. मी ऑक्सफर्डमध्ये शिकत असताना बरेच वेळेला मी त्यांच्याकडे भेटायला जायचो. प्रत्येक वेळी ते अत्यंत आस्थेने स्वागत करीत. जिनांना मी मुंबईच्या अनेक सभांमधून देखील भाषण करताना ऐकले आहे. त्याकाळी त्यांच्या भाषणातले एक प्रमुख सूत्र म्हणजे जातीय सलोखा. जातीय सलोखा झाल्याशिवाय ब्रिटीश साम्राज्यशाहीचे जोखड आपल्या मानेवरून निघणार नाही हे त्यांचे त्याकाळी ठाम मत होते. त्याकाळी ते युवकाचे अक्षरशः दैवत होते. माझे व जिनांचे संबंध तेव्हा अगदी जिव्हाळ्याचे असले तरी मला उचलून असे कधी त्यांनी काम वगैर कधीही दिले नाही.

माझ्या वकिलीच्या पहिल्या आठ वर्षांच्या काळात म्हणण्यासारखी माझी वकिली कधीच चालली नाही. आणि जिनांना हे चांगलच ठाऊक होतं. तरीही त्यांनी व्यावसायिक मदत म्हणतात ती कधीच केली नाही. एकसुद्धा खटला मला दिला नाही. तरीही त्यांच्या चेंबरमध्ये राहून मी पुष्कळस शिकलो. एकदा सहज आम्ही बसलो असताना अचानक जीना म्हणाले 'मला माहीत आहे तुला माझ्याविषयी काय वाटतं ते. मी तुला एकही काम देत नाही ना, पण लक्षात ठेव एक दिवस असा येईल की तू माझे आभार मानशील. तेव्हा तू कुणाच्या तरी वशिल्याने पुढे येणार नाहीस तर स्वकर्तृत्वावर तुझा इमला उभारला जाईल.

## तुम्ही पारसी मुलीशीच का लग्न केलंत ?

जीना हे अतिशय भावनाशून्य गृहस्थ होते यात काहीच शंका नाही. पण एके ठिकाणी मात्र ते आयुष्यभर अत्यंत मुदुतेने वागले. त्यांच्या पत्नीच्या बाबतीत जीना वाजवीपेक्षा सौम्य वागले. तशी जिनांच्या लग्नाची हकीकत सुद्धा गंमतशीरच आहे. मुंबईचे प्रख्यात सर दिनशा पेटीट व जीना हे अत्यंत जिव्हाळ्याचे असे खास मित्र होते. जिनांच्या एकेकाळच्या प्रबळ राष्ट्रवादामुळे व प्रखर व्यक्तिमत्त्वामुळे तर जीना, दिनशांना विशेषच प्यारे होते. एकदा सर दिनशांनी जिनांना सुट्टी निमित्त आपल्याबरोबर दार्जिलींगला बोलावले. भविष्यात सौ. जिन्हा होणाऱ्या रुती दिनशाही तिथेच होत्या. जीना व रुती एकमेकांच्या सहवासात आले व त्यांनी ठरवलं की बस्स आपण लग्न करायचं. जीना लगोलग सर दिनशांकडे गेले व मोठ्या साळसूदपणे आंतरधर्मिय लग्नाविषयी सर दिनशांचे मत विचारले. दिनशानी बेसावध अवस्थेत मोठ्या ठामपणे सांगितलं की जर राष्ट्रवाद जोपासला जाणारच असेल तर तो आंतरधर्मिय लग्नामुळेच. राष्ट्रीय एकात्मतेच्या वृद्धीसाठी आंतरधर्मिय लग्ने ही अत्यंत फायद्याची ठरतील. जिनानी संधी साधून दिनशांना त्यांच्या मुलीचा व स्वतःच्या लग्नासंबंधीचा विचार सांगितला. सर दिनशाना धक्काच बसला. त्यांना कल्पनासुद्धा नव्हती की स्वतःच्या मताचा स्वतःवरतीच इतका परिणाम होईल. या अवास्तव व विचित्र कल्पनेला मान्यता देण्याचे त्यांनी साफ नाकारले.

या गोष्टीला एक गमतीशीर उत्तरार्धही आहे. जिनांना एकच मुलगी होती व तिला एका पारसी घराण्यातील मुलाशी लग्न करायचे होते. सहाजिकच ती जिनाकडे आली व त्यासंबंधी अनुमती मागितली. स्वतःच्या लग्नाची कथा विसरलेल्या जिनानी मोठ्या चढ्या आवाजात तिला सांगितलं 'तुला जर लग्नच करायचं असेल तर हजारो मुसलमान तरुण आहेत. त्यांच्यातल्या कोणाचीही निवड कर. ती सुद्धा जिनांचीच मुलगी. तिनेही वडिलाना शांतपणे विचारले लाखो मुसलमान मुली असताना तुम्ही पारसी मुलीशीच लग्न का केलं. बिचारे जीना यावर काय बोलणार ?

इथं मला थोडंस सौ. जिनांविषयी सांगितलच पाहिजे. त्या हाडाच्या राष्ट्रवादी होत्या. त्या होत्या तोपर्यंत त्यांनी जिनाना योग्य मार्गावरच ठेवले. जिनांचे वैवाहिक जीवन तितकसं यशस्वी ठरलं नाही. ज्या व्यक्तीमत्त्वाकरता सौ. जिनानी जिनाशी लग्न केलं होतं ते त्यांच्या फारसं कधी वाट्याला आलं नाही. त्यांची विनोदबुद्धी खरोखरच अत्यंत तीक्ष्ण होती. त्या गेल्या त्या दिवशी मी पहिल्यांदा जिनांच्या डोळ्यात पाणी तरळत असलेले पाहिले. खरोखरच इतक्या सुरेख व तरुण रुती जिनाना मरणाच्या कराल जबड्यात पाहून विषाद वाटत होता.

त्यानंतर जिनांची साथ केली ती त्यांच्या बहिणीने. त्यांच्याबद्दल मी पुढे सांगेनच.

त्यावेळी जिनाना मी अनेकवेळेला चेंबरमध्ये भेटत असे. प्रत्येक वेळी ते कितीही गडबडीत असले तरी अत्यंत आस्थेने ते दरवेळी माझी चौकशी करीत. त्या काळी जीना माझेसुद्धा दैवत होते यात शकाच नाही. मला तरी काय ठाऊक की एकवेळचा धर्मनिरपेक्ष नेताच पुढे कट्टर जातीयवादी पुढारी बनेल व हिंदुस्थानच्या फाळणीसाठी झगडेल.

माझ्यापुरता विचार करताना राजकारणात मी सदैव तीन तत्त्वावर अविचल श्रद्धा ठेवली. (१) एकता (२) धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही. हिंदुस्थानच्या नकाशाकडे सहज म्हणून जरी आपण दृष्टिक्षेप टाकला तरी क्षणार्धात आपली खात्री पटते की, ही भूमी एक देश म्हणून रहाण्याकरताच ईश्वराने निर्मिली आहे. उत्तरेला हिमालय तर इतर तीन दिशा अमर्याद सागराने व्यापलेला हिंदुस्थान हा एक देश राहील हे विधिलिखीतच होतं जणू. त्यामुळे एकता हे माझे पहिले तत्त्व राहिले. मला असं नेहमीच वाटतं की, राष्ट्रवाद हा धार्मिक किंवा जातीय घटकावर आधारलेला असू नये. एखाद्याला स्वतःचा धर्म जरूर आवडावा परंतु धर्मप्रेम हे राष्ट्र-

प्रेमाच्या नंतरच यायला हवं. यातच भाषिक राष्ट्रवादाचाही धोका असण्याची शक्यता आहे. प्रत्येकाला स्वतःची मातृभाषा अत्यंत प्यारी असते यात काहीच शंका नाही. त्याच्या संस्कृतीचे गोडवे तीच भाषा गात असते. पण मला तरीही असं वाटत की, सर्व देशाकरता म्हणून एक माध्यम असावं, की ज्यातून त्या देशाचा सुसंवाद घडू शकेल.

मी स्वत ला राष्ट्रवादी म्हणवतो. तेव्हा एक प्रश्न मला स्वतःलाच जरूर विचारता येईल.

जर मी राष्ट्रवादी (आहे) होतो तर मी मुस्लीम लीगमध्ये का प्रवेश केला? त्याचं उत्तर असं आहे की, ज्या वेळी मी भारत सोडून इग्लंडला गेलो (सन १९१९) तेव्हा जीना हे मुबईचे अनभिषिक्त सम्राटच होते. त्याचे व्यक्तिमत्त्व व वैचारिक बडखोरपणा हा कुणालाही रुचण्यासारखाच होता. त्या काळी मुस्लीम लीग ही हिंदुमुसलमानाच्या ऐक्यासाठी झगडणारी संस्था होती. जात्यंध धर्मवेडया खिलाफतवाल्या मुसलमानाशी जीना अथवा मझरुल हक् याचा काहीच संबंध नव्हता. किंबहुना या जात्यंध मुस्लीम लोकांचा बीमोड करण्यासाठीच मुस्लीम लीग अहोरात्र झटत होती. खिलाफत चळवळीला मान्यता देऊन हिंदुमुस्लीम ऐक्याचे गाधीजीचे प्रयत्न मला नेहमीच चुकीचे वाटत आले आहेत. जोपर्यंत खिलाफत व गाधीजी याच्यामध्ये धर्म हे सूत्र असे तोपर्यंत त्याचे ऐक्य ठीक असे. पण एकदा का धर्माचे सूत्र या मोहिमेतून काढून घेतले की खिलाफतवाले परत आपल्या पूर्वीच्या जात्यंध भूमिकेवर जात आणि ऐक्याचे प्रयत्न वारगळत. कॉंग्रेसमधल्या खिलाफतगारांच्या निष्ठा नतर सगळयांच्या चागल्याच ध्यानात आल्या.

## जीना का बदलले?

जोपर्यंत जीना राष्ट्रवादी होते, मुस्लीम लीग राष्ट्रवादी होती तोपर्यंत मी त्याच्याशी संबंध ठेवला. एकदा का मुस्लीम लीगने धोरण बदलले आणि जेव्हा जीना धर्मश्रद्धेला अनुसरून द्विराष्ट्रवादाचा पुरस्कार करू लागले तेव्हा लीगशी मी कसलाच संबंध ठेवला नाही. जिनाचा एक प्रखर राष्ट्रवादी पुढाऱ्यापासून ते धर्मवेडावर आधारित द्विराष्ट्रवाद कल्पनेपर्यंतचा प्रवास हे एक कोडेच आहे.

अत्यंत महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, जीना का बदलले. त्याला अनेक कारणं असू शकतील. मला महत्त्वाची वाटतात ती ही—

जिनाचा एक मोठ्ठा दुर्गुण म्हणजे अहंगडता. गाधीजीचा भारतीय राजकारणातला प्रभाव जसजसा वाढू लागला तसतशी जिनाच्या पायाखालची वाळू सरकायला लागली. त्यामुळे तिसऱ्या गोलमेज परिषदेत जेव्हा जिनाचा समावेशही करण्यात आला नाही तेव्हाच जिनांना कळून चुकलं की, आता जर आपल्याला पाय रोवून घट्ट उभं रहायचं असेल तर धर्म या कल्पनेचा उपयोग करून घेतलाच पाहिजे. गांधीजी पण धर्म मानीत होते पण धर्मातल्या नैतिक व अमूर्त तत्त्वाकडे ते विशेष आकर्षित झाले होते. तर जीना केवळ राजकारणातल्याच सूत्रांना मानीत होते. स्वप्नातदेखील जीना गाधीजीच्या तत्त्वाना शरण गेले नसते. त्यांचे अप्रतीम सूट्स व हायकॉलर्ड शर्टस् त्यानी खादीकरता कधीच सोडले नसते. माझ्या मते जीना गाधीजीचे अँटिथिसीस होते. ती एक रिॲक्शन होती.

त्यातच जिनांच्या जातीय विद्वेषाची धार अधिक तीक्ष्ण केली ती त्यांच्या बहिणीने, फातीमा जिनाने. सौ. जिनांच्या मृत्यूनंतर जिनांना केवळ एकच साथी उरला, तो म्हणजे फातीमाबाई. फातीमा जीना या जिनापेक्षाही धर्मांधळया होत्या. मला वाटतं, आपल्या साऱ्या भाषणांची तालीम जीना आपल्या बहिणीसमोर करीत असत आणि फातीमाबाई त्यात थोडे अधिकच जातीय विद्वेषाचे जहर ओतीत असे.

पडित नेहरू व महात्मा गाधी यांच्याविषयी तर जिनाच्या मनात कमालीचा द्वेष भरला होता. पडित नेहरूंचेसुद्धा जिनाविषयी कधीच चागले मत नव्हते. त्याच्या मते जिना उद्धट व विलासी होते. प्रायः एक असुसंस्कृत अगदी निरक्षर म्हणून ते जिनाना ओळखायचे. त्याना वाटायचं की, दररोजचे एक वर्तमानपत्र सोडता जिनांचं वाचन अगदीच शून्य होत. एक कल्पनाशून्य माणूस म्हणून ते जिनांकडे बघायचे. उलट जिनाच्या मते नेहरू म्हणजे राजकारणातल्या वास्तवाचा अंदाज नसणारे एक स्वप्नवेडे राजकारणी होते. दुर्दैवाने दोघाचे कधीच पटले नाही.

जेव्हा तिसऱ्या गोलमेज परिषदेत जिनाना वगळण्यात आलं तेव्हाच जिनांचं परिवर्तन चालू झालं. त्याची जीना म्हणून किंमत जसजशी कमी व्हायला लागली तसतस त्यांच धर्मवेडावर आधारित परिवर्तन वेगाने व्हायला लागलं. एकदा त्यानी धर्माधिष्ठित भूमिका घेतली आणि त्यानतर त्याचा जात्यंध धार्मिक नेता म्हणून झालेला प्रवास विलक्षण वेगाचा होता. हे दूर जाणं तेव्हाच थाबलं जेव्हा जीना द्विराष्ट्रवादाच्या कडयावर येऊन ठेपले तेव्हा. तसे मुस्लीम लीगमधले त्यांचे बहुतेक साथीदार अत्यंत सामान्य होते. त्यामुळे त्याचा हा दुसऱ्या टोकाचा प्रवास जवळ जवळ त्यांनी एकटयानीच सांभाळला. अर्थात हस्ते परहस्ते, कळत न कळतही ब्रिटिशानीही त्यांना मदत केली.

माझ्या मते भारताची फाळणी टाळता आली असती. फाळणीने आपले तोटेच अधिक झाले आहेत. जेव्हा ६ कोटी मुसलमान भारतात होते तेव्हा मुसलमानाच खास राज्य म्हणून पाकिस्तानची हाकाटी करणं केवळ मूर्खपणाच होतं. मी एकदा जिनाना विचारले होते की, मुसलमानाकरता पाकिस्तान म्हणून सारा वेळ झगडत आहात पण उत्तर प्रदेशसारख्या ठिकाणी राहणाऱ्या मुस्लिमाची काय सोय? त्यानी दिलेलं उत्तर मी कधीच विसरणार नाही. क्षणभर त्यांनी माझ्याकडे पाहिलं व कोरडया स्वरात म्हणाले, 'ते त्याचं पाहून घेतील. त्याच्या भविष्यात मला काहीच स्वारस्य नाही.'

अर्थात आपल्या बाजूनेही आपण पुष्कळच चुका केल्या. आपण आपला डाव नीट खेळलो नाही हेही तेवढंच खरं आहे.

स्वतंत्र झाल्यावर मुस्लीम लीगला बरोबर घेऊन राज्य करणे खरोखरच अशक्य होते का, याचा विचार आपण कधी केलाच नाही. का आपल्याला सत्तेचीच घाई झाली होती. कॉंग्रेस फाळणीला खरोखरच मान्यता देईल असे जिनाना कधी वाटले असेल, असे मला वाटत नाही. फाळणीचे भूत जीना नेहमीच सौद्याकरता वापरीत आले, असं मला नेहमीच वाटत आलं आहे. त्यांनी द्विराष्ट्रवाद सोडून अखंड हिंदुस्थान मान्य केला असता असं अजूनही मला वाटतं. ज्या पाकिस्तानचे दोन तुकडे होणार आहेत आणि त्यामधली भूमी भारताने व्यापली आहे अशा प्रकारच्या योजनेवर त्या

व्यवहारवादी माणसाची निष्ठा असेल की नाही याची शंकाच आहे. तसं बघायला गेलं तर बंगालमध्ये सुऱ्हावर्दी जिनांच्याबरोबर यायला नाखूश होते. नॉर्थ-वेस्ट फ्रॉंटीअरमध्ये सरहद्द गांधींचा जबरदस्त प्रभाव होता. पंजाबमध्येही जिनांना विशेष असं पाठबळ नव्हतं. या सगळ्या गोष्टी पाहिल्यावर वाटतं की, आपण आपला डाव नीट खेळलो नाही.

महात्मा गांधींनी खिलाफतगारांशी मैत्री केल्याने लीगला जणू चिथावणीच मिळाली. माझ्या मते फाळणीचं एक प्रमुख कारण म्हणजे त्या काळी उत्तर प्रदेशात घडलेल्या घडामोडी. जर जवाहरलाल नेहरू त्यावेळी उत्तर प्रदेशमध्ये सर्व पक्षीय मंत्रिमंडळाला मान्यता देते व त्याचप्रमाणे मुस्लीम लीगच्या प्रतिनिधीला काँग्रेसच्या शपथेवर सही करण्याचा आग्रह न करते तर इतिहास पुष्कळच वेगळा दिसला असता. जवाहरलाल नेहरूंनी सांगितलेलं अजून मला आठवतं. खालिक्कज झमान नेहरूंचे खास मित्रही त्यांच्याविरुद्ध गेले व त्यांनीही उत्तर प्रदेशात स्वतंत्र पाकिस्तानची मुहूर्तमेढ रोवली. उत्तर प्रदेश हे मुसलमानांचं सांस्कृतिक माहेरघर. जर उत्तर प्रदेशने फाळणीचा पाठपुरावा केला नसता तर फाळणी होणं शक्यच नव्हतं. त्यामुळे जर नेहरू त्या वेळी सर्वपक्षीय सरकारला मान्यता देते तर ही जी फुटाफूट झाली तीही टळली असती व जर उत्तर प्रदेश फाळणीच्याबाबत शांत राहिला असता तर फाळणीची चिन्हे अगदीच अस्पष्ट होत गली असती यात काहीच शंका नाही. ◻

[ क्रमशः ]

**रोझेस इन डिसेंबर** : महंमद करीम छगला, प्रकाशक : भारतीय विद्या भवन, पृष्ठे ५६२, किं. ४५ रुपये.



# स्वकुल तारक सुता

सौ. उषा दा. कुलकर्णी

तब्बल आठ मुलांच्या पाठीवर मला मुलगी झाली. माझ्या सकल सौभाग्यात असलेली एकमेव उणीव अशा रीतीने भरून निघाल्या-बद्दल, मी त्या परमेशाचे मनोमन आभार मानले. हॉस्पिटलमध्ये मला भेटायला आलेल्या अवघ्या शेजीबाईंनी आणि महिला मंडळातील तमाम भगिनींनी हळहळ, सहानु-भूती इ. सारे व्यक्त केले. त्यांच्या मते माझी मुलगी म्हणजे दुष्काळात तेरावा महिना होता. पण मला मात्र तसे वाटत नव्हते. आपले राष्ट्रपती गिरी, रॉबर्ट केनेडी यांच्या स्त्रियांची जगविख्यात उदाहरणे मी त्यांचे तोंडावर वेशक फेकून देऊन त्यांच्या चुरचुर-णाऱ्या जिभा बंद केल्या.

माझ्या मुलीला मी लहानपणापासूनच उत्तम वळण लावून 'स्वकुल तारकसुता' करून सोडायचे ठरवले. त्यासाठी तिला शिस्त लावणे सुरू केले. ५–६ महिन्याच्या माणकीला (माणीक) मी शी, शू करण्याच्या वेळेला पाळण्याबाहेर काढून बाजूला धरू लागले. परिणामतः माझ्या शिस्तीची वेळ आणि तिची नैसर्गिक वेळ यांची सारखी फारकत होऊ लागली. मग वैतागून मी आपल्या शिस्तीलाच पायबंद घातला. हो, म्हटलंच आहे. स्त्रीहट्ट, बालहट्ट, राजहट्ट यांच्यापुढे कोणाची मात्रा चालत नाही.

माणिक पाळण्यात दांडगाई करायची. अंगावर घातलेली दुपटी पायाने लाथाडून द्यायची. एकसारखी झबली भिजवायची. तिला कपडयांचा अगदी कंटाळा. मग मी मुळी तिला उघडीच ठेवू लागले. म्हटले, मिनी युगातला हिचा जन्म. कमीतकमी कपडयांपासून अजिबात कपडे नसण्यापर्यंतची सवय नाहीतरी तिला व्हायलाच हवी.

अशी माणकी वाढत होती. तिने छान बाळसे घेतले होते. गरगरीत फुगलेला बटाटे-वडाच जणू. तिच्या आठही भावांनी तिला आठ नावे ठेवली होती. शिवाय वडिलांचे नववे निराळेच. गोळोजी, भोपळोजी, ढब्बू-खान, बलभीम, पंप्पाशेट इ. पण मी मात्र तिला माणकीच म्हणायची. हो ! माझं नववं रत्न होतं ते.

माणकी २–२॥ वर्षाची झाली आणि तिच्या एकेक लीला वाढू लागल्या. खेळता खेळता शेजारच्या ४।२ मुलांना मारपीट करून त्यांच्या हातचा खाऊ, खेळणी हिसका-वून घेऊनच ती घरी यायची.

'माझी पोरगी रडतराऊत नाही काही. रणरागिणी आहे ! इति मी. नंतर नंतर ती आपल्या वडील भावांचे अनुकरण करू लागली. आपल्या मित्रमैत्रीणींना साल्या, भलव्या, भालखाव, कुच्चा इ. बोबडया शिव्या ती देऊ लागली. 'च्यायला तुला थोकून कालीन' असे आवेशाने म्हणू लागली. पण ह्या तिच्या खोडया मला मुळीच अस्वस्थ करीनात. 'अनुकरण प्रवृत्ती ही एक सहज प्रवृत्ती आहे. मुलांना अकरणात्मक उपदेश करू नये' इ. मानसशास्त्राचे नियम मला अगदी पाठ होते. उगीच नाही काही, मानस-शास्त्र स्पेशल घेऊन मी बी. ए. झाले आहे.

होता करता माणकी शाळेत जाऊ लागली. तिथेही ती असाधारण प्रताप गाजवू लागली. बाई अथवा मास्तर पाठमोरे झाले की पेनने त्यांच्या साडीवर किंवा शर्टावर माणकी न चुकता शाई उडवायची. सारा वर्ग मग जोरात हसायचा पण माणकीचे नाव सांगा-यला कोणी धजायचे नाही. दादा होती ना ती वर्गाची !

एकदा एका शिक्षिकेने माणकीला करडा दम भरला. 'पालक घेऊन ये उद्या' त्यांनी फर्मावले. आणि आमच्या माणकीने आठवणीने न विसरता, एक पालकाची गड्डी प्लॅस्टिकच्या पिशवीत घालून वर्गात नेली. मला बापडीला वाटले, बॉटनीचे काही प्रात्यक्षिक असावे; पण शाळेतून चिठ्ठी आली तेव्हा कुठे डोक्यात प्रकाश पडला. माणकीच्या चतुर-बुद्धीचे मी मनोमन कौतुक केले. वाढत्या वयावरोबर लीलाचातुर्यही वाढत होते. आणि आम्ही उभयता आईवडील तिला उत्तरोत्तर प्रोत्साहनच देत होतो.

मुलांना सारखे धारेवर धरल्याने ती कुढी बनतात. त्यांना मुक्त खेळू-बागडू द्यावे. मानसशास्त्र मी कोळून प्याले होते. माणिकचे डॅडी तर पराकाष्ठेचे पुरोगामी. एकदा नव्हे, दोनदा नव्हे तर तीनदा विलायतची वारी करून आले होते ते. 'माझी पोरगी बंदा रुपया आहे. तिला मी स्टंट बनविणार आहे. तिला मी पुरुषापेक्षा पुरुष बनविणार आहे. ती बायकांची रडकी जात मला नाही आवडत.' ते म्हणायचे.

माणकीचा वाढदिवस नारळीपौर्णिमेला यायचा. मग घरात गोड काय करायचे यावर वाद माजायचा. अकरा माणसात ऐक-मत्य होणे दुरापास्तच नव्हे का ? मग मी म्हणे, 'नारळीभात सोपा, तोच करू या' पण माणकीचे व तिच्या वडिलांचे त्यावरून फिसकटायचे. मग दोघे मिळून एक फलक तयार करीत. तो धुणे वाळत घालायच्या काठीला अडकवीत. आणि त्यांच्या घोषणा सुरू होत. वडील म्हणायचे, 'कडबूसह' की माणकी म्हणायची, 'नारळीभात झालाच पाहिजे, झालाच पाहिजे' मला मात्र दोन्ही करणे भाग पडायचे.

वडिलांच्या प्रोत्साहनाने माणकी दांडगी बनली होती. आई म्हणजे तिला 'किस झाडकी पत्ती' वाटायची. तिचा साऱ्या खाक्याच मुळी निराळा. चालणे, बोलणे, हसणे सारे मर्दानी थाटाचे, दाणदाण पाय आपटीत चालावे, फडाफड बोलावे, कोणाचा मुलाहिजा ठेवू नये इ. गुण तिने चांगलेच आत्मसात केले होते. माणकीला कॉलेजात घातली आणि पहिल्याच दिवशी ती सांगत आली की मला माणकेश्वर विष्णू, पहेलवान मारुती इ. नावे ठेवली गेली आहेत तिला फार अभिमान वाटायचा त्याचा. ट्रीप, गॅदरिंग. मोर्चा इ. कार्यक्रमात ती नेहमीच आघाडीवर असायची. कॉलेजच्या नाटकात कोणतीही भूमिका करायला ती सदैव तयार असायची. 'स्पोर्ट' होती आमची माणकी. कुढेपणा आम्ही मुळी तिला शिकवलाच

नव्हता.

हळुहळू आम्ही माणकीला स्थळे पाहू लागलो होतो. पण जिथे तिथे तिची दादागिरी आडवी यायची. शेजारीपाजारी तिला लवंगी फटाका, अ‍ॅटमबाँब, मुलुख मैदान इ. संबोधनांनी ओळखीत.

आमच्या 'स्पोर्ट' मुलीला अशी नावे ठेवणारानाच आम्ही नावे ठेवीत होतो, प्रतिगामी कुठले ! आम्ही म्हणायचो. 'अशिक्षित, अडाणी, मागासलेले, बुद्रुक इ. शेलक्या विशेषणांनी आम्हीही त्यांचा यथेच्छ समाचार घेत असू.

एकेदिवशी माणिकला एक सिनेदिग्दर्शक पहायला येणार होते. त्यांचा उपवधू मुलगा म्हणे इंजिनियर होता. 'स्पोर्ट' मुलगी हवी आहे असे आमच्या कानावर आले होते. आम्ही ही संधी दवडली नाही.

ठीक चार वाजता मुलाचे वडील (सिनेदिग्दर्शक), आई, बहीण इ. माणसे माणकीला पहावयाला आली. कसे वागायचे, ते माणकीला बजावण्याचा मी व्यर्थ प्रयत्न केला. ती पठ्ठी आज माझे जाम ऐकणार नव्हती. तिला तिची स्वतंत्र मते फुटली होती ना !

त्यादिवशी तिने आगळा पोशाख आणि नट्टापट्टा केला होता. मला न जुमानता कॅपमध्ये जाऊन ती बॉबकट करून आली होती. मिनीस्कर्ट घालून, भुवया कोरून, लिपस्टिक लावून, आयब्रोपेन्सिल वापरून ती अत्याधुनिक बनली होती.

हवापाण्याच्या गप्पा झाल्या आणि आता वधूपरीक्षेला सुरुवात होणार होती. माणकीला बसण्याकरता मी कोनसावून एक खुर्ची ठेवली ठेवली होती. पलीकडे तिच्या वडिलांची खुर्ची अशी योजना होती. पण माणकीला हे पसंत पडले नाही. दाणदाण जिना उतरत ती खाली आली आणि ड्रॉइंगरूममध्ये प्रवेशताच तिने भावी सासऱ्याच्या समोरच्या कोचावर ठाण मांडले; इतके जोराने की बराच वेळपर्यंत स्प्रिंग हालत राहिली होती. मी मानेने खूण केली पण माझ्या सूचना ती अलीकडे रीतसर धाब्यावर बसवीत होती.

रीतसर प्रश्नोत्तरांना तोंड फुटले.

'आपण काय शिकता ?' 'बी. ए. ला बसले आहे !'



'नृत्य, गायन, वादन यापैकी एखादी कला अवगत आहे काय?'

'हो, मी पियानो वाजवते, नाचते, आणि गाते सुद्धा. मी क्लासला जात होते भाटे बाईंच्या'

'ओहोहोहो ! प्रसिद्ध नर्तिका, व्हेरी गुड. मग एखादं प्रात्यक्षिक ?'

'ऑफ कोर्स' माणकीने तत्काल विठी नारायणगावकरणीचा पवित्रा घेतला व लावणी म्हणण्यास सुरुवात केली.

'का वो साहेबेब, असं लांब लांब का ? असं लांब लांब का ? । मजजवळी या, खुदकन हसा नि मांडीवर बसा ।।'

अंतीम चरण ती घोळवून म्हणत होती. हाताने 'मांडीवर बसा' चा अभिनय करीत होती. दिग्दर्शक महाशय बेहोश झाले होते. फक्त तोंडाने शिट्टी वाजवायचेच काय ते त्यानी बाकी ठेवले होते. माणकीला नुसता ऊत आला होता. पाठीवरचा नसलेला पदर दोन्ही हातानी वर उचलून, त्याची दोन्ही टोके धरून डावीकडे, उजवीकडे नाचवण्याचा अभिनय ती मुरब्बी लावणी कलाकाराप्रमाणे करीत होती. तिचे डॅडी माना डोलवीत होते. मला व भावी विहिणीला कसेसेच होत होते. तोंड दाबून बुक्क्यांचा मार मी सहन करीत होते. समेवर येऊन माणकीने लावणी संपवली. 'नृत्य आणि भावगीत ज्यात एकवटले आहे असा लावणी हा एकमेव प्रकार आहे. तिने स्पष्टीकरण केले. बी. ए. ला लावणी हा विषय घेतला होता तिने !

कार्यक्रमानंतर दिग्दर्शकानी जोरसे टाळ्या वाजवल्या. ते बेहद् खुश होते. त्यांची पत्नी मात्र निर्विकार मनाने बसली होती.

चहापाणी झाले. मंडळी निघून गेली.

माणकीच्या पप्पांनी तिची ओतप्रोत स्तुती केली आणि माझ्याकडे वळून म्हणाले, 'कसा आहे माझा अफझलखान, माझा फाजलखान, माझा सय्यद बडा, सोनार बांगला?' मी काहीच उत्तरले नाही. पण माणकीची ही पठाणी, लाडकी नावे मात्र मला मुळीच पसत नव्हती. पण मला जे आवडत नव्हते ते माणकीला व तिच्या पप्पाना फारफार आवडायचे.

ऑफिसला जाताना माणकीची रोज फर्माइश असायची.' खारे काजू, समोसे, आवा बर्फी, केला वेफर्स आणा बरं का पप्पा, न विसरता.' आणि घरचे काम हटकून विसरणारे तिचे पप्पा हे सर्व आठवणीने आणायचे.

मी म्हणायची उगीच नाही फ्राइडने तो कॉम्प्लेक्स मांडला. मुलीचा बापाकडे आणि बापाचा मुलीकडे ओढा असायचाच. मानसशास्त्राचे प्रत्यतर घरात पुरेपूर येत होते. मला आपल्या ज्ञानाच्या सत्यतेचा पुरावा सापडल्यामुळे उचंबळून येत होते. बा फ्राईडा, हे प्रभो! त्वां इडीपसगडाद्वारे हे सत्य कथिलेस, म्हणोन बरे जाहले. नाहीतर म्या पामरला तपश्चर्या करोनदेखील हे सत्य उलगडतेना.' फ्राईडेय नमः : मी हात जोडीत असे.

माणकी उपवर झाली तरी पप्पा घरी आले रे आले की त्यांच्या गळयाला मिठी मारून लाडेलाडे बोलायची. एकदा मी न राहवून म्हणाले, 'हे बरं नाही दिसत आता माणके, तू मोठी झालीस ना.'

'इडीयट, नॉनसेन्स, सनातनी, बूर्ज्वा इ. नव्याजुन्या साहित्यिक, असाहित्यिक शिव्या तिने मला सहजगत्या अर्पण केल्या. 'पोरपण आहे, लग्न झाल्यावर होईल ठीक' मी पुटपुटले.

'ए गप्प बस ग. तू नको आमच्यामध्ये पडू. माझा सोनार बागला, माझा अफझुल्या, माझा फाजल्या, माझा सय्यदबंडा' पुन्हा एकदा वडिलानी लाडक्या नावांची मालिका गुंफली.

'तुका म्हणे उगी रहा, जे जे होईल ते ते पहा' हा बाणा मी स्वीकारला होता.

एके दिवशी सकाळच्या डाकेने एक पाकीट पत्र आले. त्या आंतर्देशीय पत्रावर माणकीला पहायला आलेल्या दिग्दर्शक महाशयाचा पत्ता होता. अधीरतेने मी पत्र फोडले. माणकी ताडकन् आरामखुर्चीतून उठली आणि माझ्या पाठीमागे येऊन उभी राहिली.

'तुमची कन्यका एकदम छान आहे. स्टंट आहे. बोल्ड आहे. कलावंत आहे. तिचे नृत्यगान अभिनय कौशल्य पाहून मी चाट पडलो. खरोखरी ती लाखात एक माणिक आहे.' (माणकीचा चेहरा पाकळीपाकळीने उमलत होता.) मला ती फार आवडली. माझ्या ओळखीचे एक म्युझिक डायरेक्टर आहेत. अद्यापी अविवाहीत आहेत. त्यांना विचारू का? ताबडतोब कळविणे.'

बर्फाचा कडा कोसळावा त्याप्रमाणे मी मनातून कोसळले. खांद्यावरचा माणकीचा हात फिडकारून मी सुन्न मनाने सोफ्यावर बसले. पण माणकीला त्याचे फारसे काही वाटलेले दिसले नाही.

'छे! आई, तू अगदीच बाई ही आहेस. अग अपयश ही यशाची पहिली पायरी आहे. अग, एक नाहीतर दुसरा. छप्पन्न पडले आहेत बाजारात नवरे. मी तरी कुठे पसत करणार होते त्याच्या इजिनिअर मुलाला. मला एखादा नट, ज्यूडो स्पेशॅलिस्ट, दिग्दर्शक, फोटोग्राफर, असाच नवरा करायचा आहे. नुसता शामळू नकोच.' 'चल, मला फक्कडशी नेसकॅफ करून दे कपभर.'

माणकीची आज्ञा मी शिरसावंद्य मानली. तिच्या मनावर आघात होऊ द्यायचा नव्हता मला. ती सावरली होती, मग मी कशाला ताप करून घेऊ? घटाघटा कॉफी पिऊन, उत्साही होत्साती, माणकी ड्रेस करून बॅडमिंटन कोर्टावर गेलीसुद्धा.'

पुढच्या रविवारी दुसरे एक स्थळवाले पहावयाला आले. त्यांनी व्यायामाच्या आवडीसबंधी विचारता माणकीने तात्काळ वाट न पाहता योगासनाच्या प्रात्यक्षिकाला सुरुवात केली. नशीब माझे की त्या दिवशी तिने बेलबॉटम घातला होता. माझ्या पोटात गोळा उठला होता. पण पाहुण्यानी लगेच तिला प्रात्यक्षिक नको म्हणून सागितले.

"आणखी काही ॲक्टिव्हिटिज?' त्यानी पुढचा प्रश्न केला.

'मी 'लिंनिस' समितीची सदस्या आहे.'

'ही कोणती सस्था बुवा?'

'लिंगवाद निर्मूलन समिती

'वाहवा! वाहवा! भले शाब्बास. आम्हाला डोके खाजवूनही हे नाव आठवले नसते.'

मग कार्य कोणते करता?'

''विवाहपूर्व लैंगिक स्वातंत्र्य' हा स्त्रीचा हक्क म्हणून मान्य व्हावा यासाठी आम्ही चळवळ करीत आहोत.' माणकीने झोकात उत्तर दिले.

नंतर पाहुण्याच्या बरोबरच दिलेली खिचडी दोन मिनिटात चट्टामट्टा करून व वर घटाघटा चहा पिऊन माणकी मोकळीसुद्धा झाली. हळू हळू खाणेपिणे म्हणजे फॉर्मलिटी. तिला ते रुचत नसे. पाहुणेमंडळीचे खाणेपिणे उरकायला कमीतकमी पंधरा मिनिटे लागली. तोपर्यंत माणकीचे जिमखान्यावर गमनसुद्धा झाले होते.

ह्याही स्थळाकडून गुलाबी भाषेतील साखर पेरणीनतर नकारच आला होता. तेव्हा माणकीचे पप्पा मला म्हणाले, 'तू काय अशी घाबरतेस. माझ्या अफझुल्याला सय्यदला, बांगल्याला मी लाखो नवरे आणून समोर उभे करीन. शीर सलामत तो पगडी पचास.'

त्याच्या फाजील आत्मविश्वासावर माझा अलीकडे चांगलाच विश्वास बसू लागला होता. मी फक्त मान हलवली.

दरम्यानच्या काळात पुण्यातील एका महिला सघटनेने अष्टपुत्रा सौभाग्यवती स्त्रियांचा सन्मानसोहळा आयोजित केला. अनेक अष्टपुत्रा सौ. ना बोलावून त्याची त्यानी खणानारळाने ओटी भरली आणि सत्कार केला. या समारभाला आमचे माणिक उपस्थित राहिले होते. ओटी भरणाच्या कार्यक्रमानतर आभारप्रदर्शन झाले व आणखी कोणाला काही बोलावयाचे आहे काय? अशी विचारणा करण्यात आली.

क्षणार्धात माणकी स्टेजवर हजर झाली. माझा जीव सुपाएवढा झाला. प्रत्यक्ष माझीच मुलगी माझ्यावर स्तुतीसुमने उधळणार होती.

'भगिनीनो, माझ्या मम्मीचा आज आपण सत्कार केलात, तो कशाकरता हेच मला समजत नाही. तिला आठ मुलगे व मी एक नववी मुलगी झाले ही गोष्ट काय गौरव करण्यासारखी आहे? यात मम्मीचा पुरुषार्थ तो कोणता? (पुरुषार्थ शब्द चूक— एक आवाज.) दुष्काळ, दारिद्र्य, बेकारी, महागाई यानी स्वातंत्र्योत्तर काळातही भारत गांजलेलाच राहिला आहे. अशा

स्थितीत आमच्या मातोश्रींनी कुटुंबनियोजन न करता खंडीभर मुलांना जन्म देऊन काय साधले ? मी अशा स्त्रियांचा धिक्कार करते. म्हणे आमचा नवरत्न दरबार! छी!' आणखीही बरेच अकलेचे तारे त्या दिवशी तुटले. पण गोळा करायला परडी नसल्यामुळे मी घरी सूबाल्या केला. यः पलायते स जीवति।

माणकीने घरी येताच नेहमीप्रमाणे वडिलांना सर्व कथन केले. 'जीते रहो पठ्ठे' म्हणून त्यानी तिच्या पाठीवर जोरात दणका मारला आणि एक गालगुच्चा घेतला. मातोश्रीवर विजय मिळवल्याबद्दल एक सिनेमा दाखवण्याचे कबूल केले.

असे कित्येक दिवस लोटले. स्थळांसबधीची आमची मोहीम आम्ही जारी ठेवलीच होती. अनेक स्थळे येत होती आणि वाऱ्यासारखी निसटून जात होती. बाण अचूक लागत नव्हता.

लेकिन एक दिन नसीबने पलटा खाया. एका अमेरिकेत स्थाईक होऊ पहाणाऱ्या मुलाला महिन्याभरात लग्न करून रुज व्हायचे होते. त्यांना सुदृढ बांध्याची, नृत्य-गायनादी कलानिपुण, पाश्चात्य मॅनर्स व एटीकेटस् उत्तम जाणणारी, बोल्ड, ग्रॅज्युएट मुलगी हवी होती. जमले. आमची माणकी या अटीत अगदी फिट्ट बसली न काय. आठ दिवसात साखरपुडा सुद्धा झाला.

आताशी पप्पा आणि माणकी यांच्या प्रेमाला (वात्सल्य म्हणू हवे तर) नुसते उधाण आले होते. 'अरे बागल्या रोज रोज लावलचक पत्र पाठवायच बरं का'

'हो ना पप्पा. मी तुम्हाला अगदी मारुतीच्या शेपटाएवढं पत्र पाठवीन पण तुम्ही मला पत्रातून सय्यद बडा, अफझुल्या असं नका बरका लिहू.'

'त्यात काय, साग तुझ्या नवऱ्याला की माझे पप्पा शिवचरित्र लिहीत आहेत.'

आणि अशा सवादानतर जी काही खस-खस पिकायची की काही पुसूच नये.

मलाही नाही म्हटले तरी बराच आनद झाला होता. माणकी कटणार होती. माझा घोर मिटणार होता. हौशीहौशीने मी रुखवताची तयारी करू लागले. बत्ताशावरचे पेंटिंग म्हणजे तर माझ्या हातचा मळ. ४॥ रुपये खर्चून मी दगडू हलवायाकडून वर्तुळा-कार बत्तासा आणला. आणि त्यावर शाकुंतलातला तो सुप्रसिद्ध श्लोक वळणदार अक्षरात चमकत्या शाईने लिहून काढला. स्वतःच्या त्या शिल्पखोदाईवर मी बेहद्द खुश होते. मोठ्या अभिमानाने मी सध्याकाळी 'हे' घरी आल्यावर त्यांना तो बत्तासा दाखवला.

'शुश्रूषस्व गुरून्कुरु प्रियसखीवृत्ती सपत्नी-जने।

भर्तृविप्रकृतापी रोषणतया मा स्म प्रतीपं गमः॥

– – – – – – – – – – – – – –।

– – – – – – – – – – – – – ॥

ह्यानी कुत्सित स्वरात श्लोक वाचून पुरा केला. पाठोपाठ माणकीचे सात मजली हास्य.

'इडीयट मम्मी, व्हॉट नॉनसेन्स—मी काय ती भुंग्याला भिणारी, हरिणाना लाडेलाडे कुरवाळणारी, वल्कले नेसणारी बावळट शकुंतला आहे? फोडून टाक आधी तो बत्तासा.'

'नही रखना, नही रखना, घरमे बत्तासा नही रखना। पिता-पुत्रीने एका घोषात सुरू केले.

बरं, तुम्हाला नाही आवडत तर राहिल मी डोळ्यातील पाणी लपवीत बोलले.

अखेर लग्न झाल. साऱ्या लग्नात माणकी ताठ मानेने वावरली. पाश्चात्य मॅनर्स, एटीकेटसचे तिने जास्तीत जास्त प्रदर्शन केले. पदोपदी इंग्रजी शब्दांची खैरात करून, नमस्काराऐवजी शेकहॅंड करून ती आपले अपटुडेटत्व सिद्ध करीत होती. रिसेप्शनच्या वेळी एकही दागिना अंगावर न घालता, अपटुडेट हेअरस्टाईल करून, मॅक्स घालून ती बसली होती. नवऱ्याला हे सारे पटत होतेसे दिसले. मैत्रीणीशी ओळख करून देताना, 'धिस इज माय हजबंड. सो अँड सो. धिस इज माय फादर इन लॉ. धिस इज माय मदर इन लॉ. शी इज माय मम्मी. ही इज माय डॅडी. इ. बोबडे इंग्रजी उच्चार करून ती सागत होती.

सोहळा उरकला आणि माणकी एकदाची सासरी गेली. माझा जीव भाड्यात पडला. मी तशी थोडीशी रडले पण मनातून विचा-राल तर मात्र मला माझा गळा मोकळा झाला असेच वाटत होते.

माणिकचे सासरचे नाव मॅग्नोलिया असे ठेवण्यात आले.

पंधरा दिवसांनी माणकीसुद्धा तिचा नवरा अमेरिकेला जाणार होता. त्याच्या घरी प्रवासाची कडेकोट तयारी चालली होती. त्यातच भेटीगाठी, चहा-पार्टी जेवणाची निमत्रणे, कपड्यालत्त्याची खरेदी नुसती धमाल उठली होती.

सासरी गेल्यापासून माणकीचे दहा दिवस आम्हाला दर्शन घडले नाही. आम्ही उभयता थोडेसे कासावीस झालो होतो. पोटचा गोळा सातासमुद्रा पलीकडे जायचा होता ना!

दिवसभर मी तिच्या वाटेकडे डोळे लावून असायची. आणि एके दिवशी एक पत्र आले. सासरचे. लोकल शिक्क्याचे, श्वशूराचे पत्र.

'आपल्या मुलीला, आपण घातलेल्या दागिन्या, कपड्यालत्त्यास परत पाठवीत आहोत. पुन्हा परत न नेण्यासाठी. तिच्या मॅनर्स, एटीकेटस पाश्चात्त्यानाही पौर्वात्य ठरविणाऱ्या आहेत. क्षमस्व.'

साश्रू नयनानी पत्राची घडी करून मी ठेवीत होते तोच टॅक्सीतून बॅगबॅगेजसुद्धा माणकी उतरली. 'मम्मी, मम्मी मी आऽले' ती पूर्वीसारखेच लाडेलाडे बोलली. मम्मी मला नको बाई तो फुलीश हजबंड. मॅडोवा कुठचा. मॅनर्सच नाहीत मुळी त्याला. माझे नाही पटणार त्याच्याशी.' मी म्हटले, 'मी माहेरी निघून जाईन' ते म्हणाले, 'चालती हो आत्ता.' मी म्हणाले 'ऑल राईट' आणि तश्शी निघून आले. मम्मी, दागिने, कपडे घेऊन. बरोबर केले ना मम्मी?'

मी भोवळून गेले होते. इतक्यात पप्पा अवतरले. त्याच्या गळ्यात पडून माणकीने सारे निवेदन केले. दोघानी मिळून श्वशूर-गृहातील माणसांना यथेच्छ इग्रजी—मराठी शिव्या हासडल्या. मग दोघे गळ्यात पडून लागले. आणि हसता हसता नकळत रडूही लागले. पप्पा गद्गद स्वरात म्हणत होते, 'माझा सय्यद बडा, माझा अफझलखान, माझा सोनार......आणि

'स्वकुलताऽरकसुताऽ' रेडिओ किंचाळत होता.

☐ ☐



।। नजर ।। ह. शि. खरात ।।

# कोरा कागज

## सांकेतिक चित्रपट

'सात पाके बांधा' ह्या बंगाली चित्रपटावरून कोरा कागज हा चित्रपट काढला आहे. बंगाली चित्रपट अभिनयाच्या दृष्टीने उजवा होता. तसेच त्याची एकंदर हाताळणीही बरी होती. परंतु हिंदी भाषेतील कोरा कागज हा चित्रपट अनिल गांगुली ह्या दिग्दर्शकाने इतक्या सांकेतिक पद्धतीने हाताळला आहे की त्यामुळे चांगली कथा असूनही चित्रपट प्रेक्षकांची पकड घेऊ शकत नाही, किंवा तो प्रेक्षकांना भारावूनही टाकत नाही.

हिंदी चित्रपट-कथा मुळात वास्तव नसतात. एखादी चांगली कथा मिळाली तरीही निर्माता व दिग्दर्शक हे दोघीही तीमध्ये इतका मसाला टाकतात की मूळची कथाच कायापालट करते. मूळात आवश्यकता नसताना त्यात नको तिथे गाणी टाकली जातात. गाण्याचे वेड असावे पण हिंदी चित्रपटात जो प्रकार चालतो तो केव्हा बंद होणार कोण जाणे. दुसरा प्रकार फालतू विनोदाचा. फालतू आणि पाचकळ विनोद टाकून एकंदर साऱ्या कथेचा पचका करण्यात हे दिग्दर्शक स्वतःला धन्य मानतात. बरे स्वतंत्र विनोदी चित्रपट काढण्याची धमकही त्यांच्यात नसते. अगदी तथाकथित हिंदी 'न्यू व्हेव' सिनेमात सुद्धा एक दोन गाणी टाकल्याशिवाय ह्या लोकांना करमत नाही. ही गाणीही ठरून गेल्यासारखी असतात. एक 'टायटल साँग' दुसरे दुगाना, तिसरे विरहगीत, मध्येच दणदणीत कोरस गीत, शेवटी पहिलेच टायटल आणि अधून मधून जिथे जिथे हिरो हिरॉईन एकटेच असतात तेथे तेथे हमखास 'टायटल साँग'चा तुकडा टाकण्यासही मंडळी विसरत नाहीत. हे गाण्याबद्दल झाले. तीच कथा विनोदाची. सहज विनोद निर्मिती होण्याऐवजी विनोदाला वाटेल तेथे धूडगूस घालायला हे मुक्त परवानगी देतात. मग नेहमीचा शाब्दिक पाचकळ विनोद. हिरॉईनचा भाऊ, मित्र किंवा शत्रूदेखील बावळट दाखवून त्याच्याकडून माकड चेष्टा करवून घेतात. मग त्यात नेहमीप्रमाणेच स्त्री वेषांतर आलेच. कथेत सुद्धा तोच तोचपणा. हिरोहिरॉईनचे प्रेम तेही अगदी नाट्यपूर्ण बसमध्ये किंवा अपघात होऊन वगैरे. आधी हिरो गुंड वाटणे नंतर तो देवता होणे. तसेच दोघांच्या 'प्यार'मध्ये, दोघांच्या आईने वा बापाने किंवा चुलत्याने खानदान श्रीमंती किंवा दौलत हे बिब्बे घालणे, त्यामुळे ताटातूट. मग उपरती होऊन मेलो ड्रामॅटिक पश्चात्ताप. शेवटी पुन्हा अपघातात्मक की योगायोगाने गोड शेवट व शेवटी सुरुवातीचे टायटल साँग. हिंदी चित्रपटात योगायोग इतके असतात की एखादी वास्तव कथा मिळणे हा कपिलाषष्ठीचा योग मानावा लागतो. कॅमेरा, वातावरण निर्मिती वगैरे बद्दल न बोलणे बरे. तरी सध्या काही काही चित्रपटात खरोखरच चांगले छाया-चित्रण बघायला मिळते. अर्थात वरील सारे प्रकार होतात त्याला निर्माता, दिग्दर्शक जबाबदार नाहीत. आमच्या प्रेक्षकांनाच हा मालमसाला हवा असल्याने मागणी तसा पुरवठा करणारे काही धंदेवाईक शेठजी चित्रपट काढतात आणि आणि प्रेक्षकही असले चित्रपट डोक्यावर घेतात.

कोरा कागज त्यामानाने बरा चित्रपट आहे. कथा साधी व बिन मसाल्याची आहे. परंतु नायिका श्रीमंत तर नायक गरीब हा प्रकार आहेच. गरीब श्रीमंतांच्या जुन्या कल्पना उराशी बाळगणारी घरातील काही मंडळी विशेषतः आई अशा काही अपमानास्पद गोष्टी करते त्यामुळे नायकाचा स्वाभिमान दुखावला जातो. त्याला जपणाऱ्या नायिकेचा मात्र आईला सांभाळण्यात इकडे आड तिकडे विहीर असा प्रकार होतो व दोघांचाही कोंडमारा होऊन एकप्रकारे तणाव निर्माण झाल्याने ते दूर होतात. शेवटी दोघांनाही आपली चूक कळून येते व दोघेही परस्परांजवळ येतात.

चित्रपटाची सुरुवात थोडीशी फ्लॅशबॅक पद्धतीने करण्यात आली आहे. अर्चना ही आपली कर्मकहाणी सागत असते. हे असे का झाले हेच तिला कळत नाही. आणि मग तिला सारे काही आठवते शाळेच्या सुट्टीत ती घरी जायला निघालेली असते तिच्या डोक्यात मृत्यूचेही विचार येत असतात अशा एका निराश अवस्थेत ती काय घडले ते सागत असते. अर्चना एका समजस प्रिन्सिपॉलची हुशार मुलगी. (म्हणजे एम. ए. ला फर्स्ट क्लास फर्स्ट येणारी) सुकेश हा गरीब परतु प्राध्यापक असतो. दोघाचीही प्रथम बसमध्ये गाठ पडते. पुढे दोघेही एकमेकावर अनुरक्त होतात. सुकेशला आईवडील नसतात. परतु आईच्या मायेने जपणारी फुपी असते. अर्चनाच्या आईला मात्र सुकेश पसत नसतो. कारण तो गरीब असतो म्हणून. तिला श्रीमत जावई हवा असतो. परतु आईच्या विरुद्ध ती सुकेशबरोबर लग्न करते. दोघाचाही ससार सुरू होतो. अर्चना आवडीने घरच्या लोकाना भेटी आणते. परतु तिची आई सुकेशच्या कमी पगाराच्या गोष्टी वरून त्याला दुखावते, अर्थात तीही अर्चनाच्या प्रेमापोटी आपला जावई बडा आहे अशा थापा इतराच्या जवळ मारते हा प्रकार सुकेशला सहन होत नाही. परतु पैशाचे सोग त्याला काही आणता येत नाही. म्हणून तो 'टयूशन' करू लागतो. परतु अर्चनाची आई नको असताना देखील तिला 'फ्रीज' देते. टेलिफोनही देते त्यामुळे सुकेश चिडतो आणि ससार डळमळू लागतो. त्यात फुपी आपल्यामुळेच हे सारे होतय असे वाटून काशीला जाते. अर्चनामुळे फुपी गेली असे वाटून सुकेश तिला बोलतो. व घरच्या लोकाना तिला घेऊन जायला सागतो. रागाच्या भरात ती निघून जाते. सुकेशही नोकरी सोडून परागदा होतो अर्चना एम. ए. होते व एका गावच्या शाळेत नोकरी करते. सुट्टीत परत येताना अचानक सुकेश व अर्चना एकमेकाना भेटतात व गैरसमज दूर होऊन एक होतात.

दिग्दर्शकाने ही कथा नेहमीच्या साकेतिक पद्धतीने चित्रित केली आहे. 'कोरा कागद' ही कल्पना बऱ्याच ठिकाणी वापरली आहे. ती ज्या रस्त्यावरून जाते तिथे वाऱ्याने कोरा कागद येतो. पुढे तोच भिजलेला दाखविणे. सुकेशला पैशाअभावी 'आईस बॉक्स' घेता न येणे व घरी मात्र अर्चनाच्या आईने फोनवरून 'फुपी'बद्दल बोलणे व नेमके तेच फुपीने ऐकणे. त्यामुळे फुपीने सुकेशच्या भल्यासाठी काशीला जाणे. अर्चनाने घटस्फोटाच्या अर्जावर सही केल्यावर घरगड्याने चागल्यावाईटाबद्दल 'लेक्चर' देणे, सुकेश अर्चनाला भेटण्यासाठी येतो तेव्हा तिच्या भावाने त्याचा अपमान करून त्याला परत पाठविणे. ह्या गोष्टी इतक्या साचेबद झाल्या आहेत की, त्यामुळे आपण नवीन काही पाहतो आहोत असे प्रेक्षकाला मुळीच वाटत नाही. प्रेक्षकही पुढे काय होणार ह्या साऱ्या अटकळी बाधूनच चित्रपट पाहत असतो.

सुकेशचे काम विजय आनदने केले आहे. मुळात सुकेशच्या कामासाठी केलेली त्याची निवड चुकीची आहे. तो वयस्कर वाटतो. बरे, अभिनयही बेताचा. तसेच अधूनमधून तो केसाचा टोप वापरतो हे चाणाक्ष प्रेक्षकाच्या तावडतोब लक्षात येते. अर्चनाचे काम जया भादुरीने केले आहे. जया भादुरी ही काही मोठ्या ताकदीची अभिनेत्री नाही. गोड हसण्यापलीकडे व गभीर चेहरा करण्यापलीकडे तिने काही केले नाही. खरे म्हणजे ह्या चित्रपटात आतरिक सघर्ष व मानसिक कोडमारा दाखविण्यासाठी केवढा तरी वाव होता. पार्कर५१ पेन, आईस बॉक्स, पगार वगैरे कारणातून दोघांचा बेबनाव दाखविण्याऐवजी जया भादुरी व विजय आनद ह्यानी आपला सारा आतरिक व मानसिक सघर्ष सूचकतेने दाखविला असता तर ह्या चित्रपटाला एक प्रकारे 'डेप्थ' आली असती. इथे आपणास 'अविष्कार' ह्या चित्रपटाची आठवण होते. अविष्कार व कोरा कागज ह्याच्या कथा जवळ जवळ सारख्याच आहेत. परतु अविष्कारमध्ये शर्मिला टागोर व राजेश खन्ना ह्यानी आपल्या अभिनयाने मानसिक आदोलनाचे, सघर्षाचे कितीतरी मनोज्ञ दर्शन दिले आहे. पतिपत्नीच्या मनातील सघर्ष दाखविण्यात अविष्कार यशस्वी झाला आहे. कोरा कागजमध्ये मात्र हा सघर्ष योग्य ती उची गाठू शकला नाही. त्यामुळे तो म्हणावी तशी मनाची पकड घेत नाही. तसेच कोरा कागज ह्या चित्रपटाचा शेवट इतका अचानक दाखविला आहे की, त्यामुळे बऱ्याच काही गोष्टी निसटल्या आहेत. त्या चित्रपटातील विनोद अत्यत फालतू वाटतो. विनोदी प्रसगाची गरज नव्हती. सुलोचना, अचला सचदेव व हनगल ह्याचा अभिनय नेहमीसारखाच 'मेलो ड्रॅमॅटिक' आहे. कल्याणजी आनदजी ह्याच्या सगीतात काही वेगळेपणा नाही. 'मेरा जीवन कोरा कागज' हे टायटलसाँग मात्र श्रवणीय आहे.

एकदरीत कोरा कागजची कथा चांगली असूनही दिग्दर्शकच बेताचा मिळाल्याने व चित्रपट साकेतिक पद्धतीने हाताळण्याने कोरा कागज पाहिजे ते समाधान देऊ शकत नाही. ☐ ☐

फुकट, फुकट, फुकट,

# पांढरे डाग

गौतम औषधाने जवळजवळ ३० वर्षे पाढरे डागाचे रोग्याना ६ दिवसात फायदा देऊन प्रसिद्धी मिळविली आहे. एक पॉकेट औषध फुकट मागऊन फायदा मिळवा.

**गौतम आयुर्वेद भवन (SD-2)**

क्रीडांगण

# पहिली कसोटी

## कचखाऊ फलंदाजी, निर्जीव गोलंदाजी वगैरे वगैरे !

एमेम

ओल्ड ट्रॅफर्डवर पहिले चार दिवस नेमाने अधूनमधून कोसळणाऱ्या पावसानं पाचव्या दिवशी दडी मारली. त्यामुळे भारताचा पराभव झाला ही झाली एक गोष्ट. त्याचबरोबर एक 'रुखरुख' नाहीशी झाली. गेल्यावेळी याच ओल्ड ट्रॅफर्डवर पाचव्या दिवशी पाऊस पडून सामना अनिर्णित राहिला होता, आणि पाऊस नसता पडला तरीही म्हणे भारतान सामना अनिर्णित ठेवला असताच असं काही मडळीना (यात काही तज्ज्ञ क्रीडासमीक्षकही होते !) अगदी परवापरवापर्यंत वाटत होत. एकदरीत ते अनुमान चुकीच होत हे यदा पाऊस न पडल्यामुळे कळून चुकलं !

इग्लडचा कर्णधार माईक डेनिसने जेव्हा पाचव्या दिवशी आपला डाव थाबवून भारताला खेळायला दिल तेव्हा आपल्यापुढे दोन पर्याय होते. एक सामना हरण आणि दुसरा म्हणजे सामना अनिर्णित ठेवणे ! (यापैकी दूसरा पर्याय वरुणराजांच्या हाती होता !) अर्थात आपण सामना जिकू शकत नव्हतो अस म्हणण म्हणजे आपल्या खेळाडूच्या कर्तृत्वाविषयी साशकता दाखवणं असं नव्हे. तर यावेळी सर्व परिस्थितीच आपण सामना जिकण्याच्या दृष्टीने प्रतिकूल होती. दोराचं टोक होत डेनिसच्या हाती आणि तो आपल्याला विजयापासून केव्हाही मागे खेचू शकत होता.

वरवर पाहता डेनिसने सहा तासात २९६ धावा काढण्याचे दिलेले आव्हान खिलाडूपणाचे दिसते. पण त्याला खिलाडूपणाची नुसतीच नक्षीदार झिलई होती. प्रत्यक्षात मात्र अतिशय सावधानतेने, तोलून मापून डेनिसने डाव टाकला होता. इग्लडचे जलदगती गोलदाज (जास्तीत जास्त) ताशी पधरा षट्क इतकाच वेग राखू शकतात. सामना हातातून निसटतोय म्हटल्यावर हाच वेग ताशी बारा षट्क इतका कमी करणे डेनिसला अवघड नव्हते. (फार काय झाल असत तर बोबाबोब होऊन शिव्या खाव्या लागल्या असत्या !) म्हणजे सामना जिंकण्यासाठी भारताला षट्कामागे साडेतीन धावा हा वेग ठेवावा लागला असता. आक्रमक फलंदाजीबद्दल भारताची विशेष ख्याती नसली तरीही सर्वसामान्य परिस्थितीत हा वेग गाठण शक्य होत अस (फार फार तर) म्हणता येईल. पण आदल्या दिवशी दुपारपासून रात्रभर पडलेल्या पावसामुळे आऊटफिल्ड एकदम स्लो झाल होत. त्यामुळे सीमारेषेकडे चेंडू तटवण हे एक दिव्यच होत. गावसकर, सोळकर, विश्वनाथ यांच्या त्या दिवशी कमीत कमी पन्नासएक धावा तरी नक्कीच बुडाल्या असतील या स्लो आऊटफिल्डमुळे ! शिवाय बचावात्मक क्षेत्ररचना करूनही डेनिस सामना वाचवू शकत होता. एकूण काय तर आपल्यापुढे पराभव किंवा अनिर्णित हे दोनच पर्याय शिल्लक होते.

भारताच्या पराभवाचा पचनामा करायचा झाला तर नेहमीप्रमाणे शिव्या खाण्यासाठी मानाच्या पानावर भारतीय फलदाजानाच बसवावे लागेल ! ज्या पीचवर आणि ज्या गोलदाजीपुढे गावसकर विश्वनाथ खेळले त्या गोलदाजीपुढे इतरांनी खेळाव असा आग्रह कुणी धरणार नाही, धरू नये; पण ज्या गोलदाजीपुढे अबीदअलीसारखा माणूस खेळून तब्बल ७१ धावा काढतो त्या गोलदाजीवर पटेल, मदनलाल, इजिनिअर, वाडेकर याच्यापैकी एकाने तरी पाचपचवीस धावा काढण्यास काही हरकत होती का ?

पण यावेळी नुसत्या फलदाजाना शिव्या द्यायच्या नाहीत. 'गोलदाजांनी मिळवले ते फलदाजानी घालवले' हे नेहमीचे वाक्य यावेळी तरी लागू पडणार नाही. कारण गोलदाजीनेही अशीच निराशा केलीय. अर्थात कडक थडीत दोन दोन स्वेटर्स घालून ताठ बोटानी गोलदाजी करताना नेहमीच्या फिरकीची करामत अपेक्षित चूक आहे. शिवाय ऑनकडे पाचपेक्षा जास्त क्षेत्ररक्षक न ठेवण्याचा नियम इग्लडने चतुराईने लादला त्याचा जाच भारतालाच सर्वात जास्त होणार आहे. यष्टीभोवती कोडाळ करून उभ रहाणाऱ्या सोळकर, वेंकट, वाडेकर, अबीद याच्या एकत्रित क्षेत्ररक्षणाने भारतीय फिरकीचे श्रेष्ठत्व वाढले आहे हे कुणीच नाकारू शकणार नाही.

सामना हरलाय म्हणूनच निवडसमितीला दोष देणे चुकीचे आहे. तरीही वेंकटचा समावेश व सोळकरवर आघाडीच्या जोडीत खेळण्याची केलेली सक्ती यांचे स्पष्टीकरण वाडेकर, अधिकारी याना द्यावे लागेल. वाडेकर जखमी असल्यामुळे वेळप्रसगी नेतृत्त्वाची व अव्वल क्षेत्ररक्षणाची जबाबदारी उचलण्यासाठी वेंकटचा समावेश केला आहे हे स्पष्टीकरण एकवेळ पटेल, पण केवळ दोनचार कौटी सामन्यात (तेही नीट नव्हे !) आघाडीवर खेळलेल्या सोळकरला कसोटी सामन्यातही आघाडीवर पाठविण्याचा प्रयोग करण्याची काही आवश्यकता होती का ? इंजिनिअर, अबीद याच्यासारखे पूर्वी आघाडीत खेळलेले खेळाडू असताना सोळकरच आघाडीसाठी कशाला हवा होता ? का त्याचाही अशोक मंकडसारखा कचरा करून टाकायचाय ? दौऱ्याआधी भारतीय सघ निवडला तेव्हा 'हा दौरा काही प्रयोगासाठी नव्हे' असे कठरवाने ओरडून सांगणाऱ्या वाडेकर, अधिकारी यांना आपल्या विधानाचे स्मरण सोळकरला आघाडीत खेळवताना झाले नाही का ?

असो हा अक बाहेर पडेल तेव्हा दुसरा कसोटी सामना सुरू झाला असेल. दरम्यानच्या काळात एका कौटी सामन्यात सोळकरने आघाडीला येऊन शतक ठोकल्यामुळे त्याची आघाडील जागा निवडसमितीच्या दृष्टीने पक्की झाली असणार ! तशी ती न होवो व प्रसन्न, नाईक, मंकड वगैरे मडळीना सधी मिळो हीच सदिच्छा !

# साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**दि. २२ जून ७४ ते २८ जून ७४**

## इंदिरा गांधींच्या राजकीय कौशल्याचे पुनर्दर्शन

या आठवडयात भारतीय राजकारणातील सत्ताकेंद्राची सारी सूत्रे मंगळासारख्या सत्ताधीशाकडेच आहेत. त्यामुळे घटक राज्ये असोत की दिल्लीतील केंद्रसत्ता असो तेथे खळबळजनक घटना घडल्या तर नवल नाही. पंतप्रधान इंदिरा गांधी याच पुन्हा राजकीय कौशल्याच्या केंद्रबिंदू ठरल्या तर आश्चर्य वाटू नये. गेल्या आठ-पंधरा दिवसात अकारण महत्त्व प्राप्त झालेल्या शेख अब्दुल्लांना इंदिराजी योग्य स्थान दाखवतील. कुणाचे मूल्य वाढवायचे व कुणाचे अवमूल्यन करायाचे हे इंदिरा तंत्र आता सर्वज्ञात आहेच. यावेळी असेच घडेल. शेख अब्दुल्ला, फकरुद्दीन अल्ली, मोहन धारिया, डी. पी. धर, ललितनारायण मिश्रा, गफूर, स्वर्णसिंग टी. ए. पै, यशवंतराव चव्हाण, जगजीवन बाबू इत्यादी व्यक्ती या राजकीय कौशल्यात 'विचाराधीन असतील.' तारकेश्वरी सिन्हांना बिहारच्या राजकारणात चंचुप्रवेश मिळावा असे वाटते. महाराष्ट्रात कॉंग्रेस पक्षाला थोडा धक्का मिळेल.

¤

### मेष : स्वास्थ्याला तडा

मंगळ हा तुमच्या राशीला एरवी उत्तम फले देतो पण कर्क राशीत त्याचे चालू असलेले भ्रमण व त्याचा हर्शलाशी केंद्रयोग ही काही तेवढी अनुकूल घटना नाही. मातृसुखात दुरावा, राहत्या जागेत अगर घरात काहीतरी तेढ निर्माण होणे, आईवडिलांना आजाराने घेरणे वगैरे घटना यावेळी घडल्यातर आश्चर्य वाटू नये. नैराश्य, अस्वस्थपणा तब्येतीला जाणवेल. याचा अर्थ सर्वच काही प्रतिकूल घडेल असे नव्हे. आर्थिक बाजू चांगलीच बळकट राहील. मिनी लॉटरीत एखादे बक्षीस लागून जाईल. वसूल न झालेले पैसे अकस्मात हाती येतील. सोमवार ते बुधवार नोकरीत बढती-बदलीचा योग. **महिलांस** : माहेरपणाला जाण्याची इच्छा पुरी होणे जरा कठीणच वाटते. राहात्या जागेत घरमालकाकडून त्रास.

### वृषभ : व्याप वाढेल

या आठवडयात रवीसारखा तेजस्वी ग्रह राशीतून पुढे गेला आहे व त्याची तुम्हाला झाली तर मदतच होणार आहे. मंगळ तर तिसरा झाला आहे. रवी व मंगळ यावेळी तुमचे काहीतरी भले करण्यासाठी, तुमचे व्यावसायिक जीवन उत्तुंग करण्यासाठी बद्धपरिकर झाले आहेत. शनिवार-सोमवार-मंगळवार व गुरुवार या दिवसांची नोंद घ्या. तुमच्या सध्याच्या धंद्याचा पसारा वाढेल. प्रगतीच्या दिशेने अनेक योजना कार्यान्वीत होतील. नव्या उद्योगाचे रेंगाळलेले काम गती घेईल. नोकरीत गैरसमज दूर होतील. नव्या कामाच्या कार्यवाहीसाठी तुमची प्रमोशनवर नेमणूकही होईल. पैशाचे काम पुरे होईल. **महिलांस** : नोकरीचे प्रयत्न यशस्वी होतील. हाती चार पैसे घोळतील.

### मिथून : प्रगतीच्या नव्या वाटा

राशीत शनी आणि जवळच कर्क राशीत मंगळ असा समर्थ ग्रहांचा फेरा तुमच्याभोवती पडला आहे. अर्थात तो अगदी वाईटच आहे असे समजू नका. कुटुंबस्थानी कर्क राशीचा मंगळ तुमचा विचार व आखलेले बेत स्थिर ठेवणार नाही. घटकेत एक तर घटकेत दुसरे असेच घडत राहील. त्यामुळे मित्र कंटाळून जातील. हाताखालच्या माणसांनादेखील त्रास होईल. पण तुमचा कोणताही उद्योग असो वा तुम्हाला एखादा नवा उद्योग सुरू करावयाचा असो प्रगतीची नवी क्षितिजे तुमच्या दृष्टिपथात येतील. आशा आकांक्षांना योग्य तो वाव व स्फूर्ती मिळेल. सोमवार ते गुरुवार अतिशय शुभदायक. **महिलांस** : कलाक्षेत्रात संधी मिळून प्रसिद्धी कीर्ती मिळेल.

### कर्क : नोकरीत यश

तुम्हाला या आठवडयात शनी बारावा आहे पण मंगळ पहिला आहे. हा पहिला मंगळ हेच तुमचे मोठे सामर्थ्य व अद्वितीय असे यश आहे असे मानायला हरकत नाही. तुम्ही बेकारीत हाल सोशीत असलात तर मला तुम्हाला आनंदाने सांगावेसे वाटते की शनिवार ते बुधवार या मुदतीत तुमची बेकारी संपलेली असेल. शेतीपदवीधर, इंजिनियर, वकील, संशोधक यांच्यासाठी नोकऱ्या हात जोडून समोर येतील. यात अतिशयोक्ती मानण्याचे कारण नाही. ज्यांना स्वतंत्र व्यवसाय करावयाचा असेल त्यांना आर्थिक व तांत्रिक सहाय्य मिळू शकेल. जमिनीचा व निवासी जागेचा व्यवहार कोणत्याही त्रासाखेरीज पार पडेल. जागा नसणाऱ्यांना ती मिळेल. **महिलांस** : व्यक्तीमत्वाच्या प्रभावाने अनेक कामे होतील. वरिष्ठावर इम्प्रेशन पडेल.

### सिंह : पुढे पाऊल पडेल

कोणत्याच प्रकारच्या अडचणीमुळे निराश होणारा तुमचा स्वभाव नाही. त्याचप्रमाणे कोणतीच गोष्ट मनासारखी घडली नाही म्हणून प्रयत्न सोडले असेही तुमचे नाही. राशीस्वामी रवी हाच एकमेव अंतरिक्षातील प्रबल ग्रह सध्या तुम्हाला अनुकूल आहे. हा ग्रह अनुकूल असतांना खरे म्हणजे मंगळाच्या

व्ययस्थ कारस्थानाची तुम्हाला क्षिती बाळगण्याचे यत्किंचितही कारण नाही. मगळाचे सारे डावपेच तो मोडून काढणार आहे. या वेळी राजकारणात तुमचे पाऊल प्रगतीच्या दिशेने झेपावणार आहे. सत्कार, सन्मान, सार्वत्रिक लोकप्रियता, एखाद्या मोठ्या पदाची माळ गळयात पडणे असे काही तरी घडेल. पैसा मात्र हाती टिकणार नाही. नोकरीत वरचष्मा राहील. सोमवार व बुधवार हे महत्त्वाचे दिवस आहेत. **महिलांस** तुमचा जर एखादा उद्योग सुरू असेल तर त्यात अनपेक्षित गती प्राप्त होईल एखादा नवा उद्योग सुरू होईल.

**कन्या : आर्थिक स्थिती सुधारेल**

एकटे दशमस्थ रवी-शनी व अकरावा मगळ हे सामर्थ्यवान ग्रह तुमच्या आशा-आकाक्षाचे हितकर्ते बनले आहेत. तुमच्या महत्त्वाकांक्षेच्या सफलतेची सारी सूत्रे त्यानी हाती घेतली असल्यामुळे या आठवड्यात तुमच्या यशाने कुणाला हेवा वाटला तर नवल नाही. कन्या राशीच्या व्यक्तीना नेहमीच पैशाची जिगजिग असते. कामासारखे पैसे मिळत नाहीत. पण या आठवड्यात प्रामुख्याने रविवार ते बुधवार या दरम्याने तुम्हाला अर्थप्राप्तीचा जबरदस्त योग सभवतो. या वेळी लॉटरीचा निकाल असेल तर तुमच्या नशिबाला कलाटणी मिळेल. बाकी सर्वसाधारणरित्या देखील आठवडा प्रगतीकारक आहे नोकरीत फारसा त्रास नाही वरिष्ठाची मर्जी राहील दुय्यम व्यवसाय तेजीत येईल. प्रवासाचा व मगलकार्यात भाग घेण्याचा योग आहे. **महिलांस** : लेखनात प्रगती होईल. अभिनयकलेला वाव मिळेल.

**तूळ : प्रमोशनचा योग**

राशीतील हर्शलचा मगळाशी केंद्र योग होत आहे ही एकच घटना तुमच्याबाबतीत महत्त्वपूर्ण ठरावी. मगळाच्या प्रकाशाने तुमच्या दडपल्या गेलेल्या इच्छा आणि आकाक्षा, नोकरीतील तुमचे न्याय्य हक्क उजळून निघावेत अशीच ही ग्रहस्थिती आहे. नोकरीत—मग ती खाजगी असो वा सरकारी असो—तुम्हाला आश्चर्यचकित करील असे प्रमोशन मिळणार आहे. एखादी नवी खास योजना तुमच्यासाठी आखली जाईल व त्याठिकाणी तुमची नेमणूक होईल. रासायनिक उद्योग, सरकारी क्षेत्रातील महसूलखाते या क्षेत्रातील नोकराचे व्यावसायिक जीवन उजळून निघेल. आर्थिक स्थिती समाधानकारक राहील. **महिलांस** : कुमारिकांचे विवाह या आठवड्यात ठरून पार पडतील. या दृष्टीने हा आठवडा फारच महत्त्वाचा जाईल.

**वृश्चिक : उद्योगाला चालना**

राशीस्वामी भाग्यस्थानी असणे म्हणजे भाग्यचक्राला सूर्यरथाचा वेग येणे असेच मानायला हवे. अतरिक्षातील मगळाचा ज्याला लाभ होतो तो कितीही खालच्या पातळीवर असो, तो वरचे स्थान गाठल्याखेरीज राहाणार नाही. करारी स्वभाव व तसेच करारी व्यवस्थापन हा तुमचा अभिमानास्पद गुणधर्म आहे. जमिनीचा खरेदी विक्रीचा व्यवहार, प्लॅस्टिक व ॲल्युमिनियमचे उद्योग, खाण उद्योग याच्याशी ज्या वृश्चिक व्यक्ती निगडीत असतील त्याच्या कर्तृत्वाला उजळा तर मिळेलच पण मदावलेली व थाबलेली उद्योगाची प्रगती आता मार्गी लागेल. अडचणीवर तुम्ही मात करू शकाल. आर्थिक उलाढालीत व नव्या करारात मात्र गुतू नका **महिलांस** . तुम्ही तुमच्या तापट स्वभावाला थोडी मुरड घातलीत व जुळते मिळते घेतलेत तर नोकरीत बरेच काही हाती लागेल.

**धनू : निराश होऊ नका**

आठवा मगळ व बारावा राहू या दोनच ग्रहानी तुमचे जीवन सध्या विस्कळीत करून टाकले आहे. तब्येतीला रोज काही ना काही होत आहे असे तुम्हाला वाटत राहील. डोके, हृदय, लिव्हर, हातपाय यांना काही तरी दुःख होत असेल. झोपेचा त्रास तर विचारू नका. प्रामुख्याने रात्री तुम्ही बहुधा ' गलितगात्र ' होत असाल. पण मगळाचेच हे सारे ' वरदान ' असल्यामुळे त्याला तुमचा इलाज नाही. उपासना करा. त्रास कमी होईल. फक्त निराश होऊ नका. हेही दिवस जातील व नव्या कर्तृत्वाने तुमचे जीवन चमकून निघेल. फक्त राग, सताप टाळा. नोकरीत त्रास नाही. पैसाही मिळेल. **महिलांस** : उदास न होणे हाच तुम्हाला या वेळचा आदेश आहे. आपल्या कामात मग्न राहा.

**मकर : अपेक्षित यश**

या आठवड्यात काही शुभदायक घडेल असे मानायला हरकत नाही. त्याचबरोबर काही क्षेत्रात माघारीची व मानहानीचीदेखील पाळी येईल. याला तोड देण्याची तयारी ठेवायला हवी. सातव्या मगळाची ब्याद सप्तम स्थानी येऊन बसली आहे व तो अजून तरी काही काळ तेथे राहाणार आहे. मुळातच जर नवरा बायकोची भाडणे असतील तर हा मगळ त्याला काडी लावल्याखेरीज राहाणार नाही. यावेळी नव्या ससारी लोकांनी समजुतीने वागावे. पण हा त्रासदायक योग सोडला तर कोणत्याही क्षेत्रातील तुमचे विरोधक कितीही बलवान असोत त्याचे बड तुम्ही मोडून काढण्यात मोठे यश मिळवाल यात मात्र शका नाही. राजकारण असो वा नोकरी असो तुमचे विरोधक हतबल होतील. आर्थिक स्थिती बरी राहील. **महिलांस** ' यावेळी नवे धाडस करू नका. नोकरीत तुमचे महत्त्व वाढेल.

**कुंभ : नव्या पदावर नियुक्ती**

शनी-रवी एकमेकाचे हाडवैरी आहेत व ते तुमच्या पचमस्थानी ठाण माडून बसले आहेत पण या वेळी दोघेही तुम्हाला मदत करायला उत्सुक आहेत. सहावा मगळ विरोधक व गुप्त शत्रूच्या साऱ्या कारवाया अशा काही मोडून काढील की त्याना जन्माची आठवण राहावी. रविवार ते गुरुवार या दिवसाची नोद घ्या. तुम्ही राजकारणात असाल, सत्तारूढ पक्षात असाल तर यावेळी तुम्हालाही अनपेक्षित वाटावे असे एखादे महत्त्वाचे पद तुम्हाला मिळावे. हे पद सर्वसामान्याच्या दृष्टीने तरी अत्युच्च असावे नोकरी करणाऱ्याना वरिष्ठ पदावर नियुक्ती झाल्याचा आनद मिळेल तर वरिष्ठ जागेवर असलेल्याना खास बक्षिसी मिळेल. विशेष महत्त्वाची बाब म्हणजे या वेळी कोणत्याही क्षेत्रातील बेकाराला उद्योगधदा मिळाल्याखेरीज राहाणार नाही. **महिलांस** . वय वाढलेल्या व लग्नासाठी निराश झालेल्या मुलीच्या आशाआकाक्षा यावेळी पुऱ्या होतील.

**मीन : मनाचा गोंधळ टाळा**

मगळाचे कर्क राशीतील ठाण ही एकमेव गोष्ट तुम्हाला हवे ते देण्याची जबाबदारी स्वीकारणार आहे तेवढी जर जमेची बाजू सोडली तर यावेळी सयम व विवेक शक्ती जागृत ठेवूनच वागायला हवे. बारावा गुरू नोकरीत व लेखनात मनासारखे काही होऊ देणार नाही. काम कीतीही चागले केलेत तरी बोलणी खावी लागतील. कामाचा ताणदेखील वाढणार आहे. पण मगळाचे वरदान असल्यामुळे त्यातही तुम्ही जिंकाल. कामात चुका होणार नाहीत. जबाबदारी पार पडेल. भावनेच्या आहारी जाण्यापेक्षा विवेकाच्या व कौशल्याच्या आहारी जाऊन वागा. चार मित्राचे आर्थिक व तात्रिक सहकार्य मिळेल. बेकाराना आशादायक वातावरण राहील. पैसे मात्र खर्च होऊन जातील. ती काळजी राहील. तब्येत जरा सुधारेल. उत्साह वाटेल. परीक्षेचा एखादा निर्णय आनद देईल. **महिलांस** : बरोबरच्या महिला मैत्रिणीच्या बातमीवर विश्वासून मन सशयी बनवू नका ☐


# चकनाचूर

भाऊ पाध्ये

## लाट ओसरली कॅरेक्टरसाठी शोध चालू

राजेश लाट काही वर्षांपूर्वी ओसरली. आता त्याचा तो गुरू शर्ट गेला होता, त्याची आराधना स्टाईलचे ' मेरे सपनो की रानी ' वाली अदाकारी गेली होती आणि चिल्ड्रेन्स पार्कमधल्या बेबी ट्रेनचे उद्‌घाटनासाठी आमंत्रणही त्याला येत नव्हते.

एकच गोष्ट झाली. राजेशचे डिंपलशी लग्न झाले. वास्तविक डिंपल ही राजेशपेक्षा कितीतरी स्पाँटेनियस अदाकारी. पण तिने राजेशशी लग्न केले. ' बॉबी 'ची लोकप्रियता आणि राजेश लाट यांचा संगम होऊन आता ही मंडळी भविष्यकाळाच्या सागरात लुप्त होणार असे दिसू लागले होते. हां ! राजेश-डिंपल यांचे लग्न मोठ्या दिमाखात झाले. राजेशच्या लग्नाची शान दुसऱ्या कुणाच्या लग्नाला येईल असे वाटत नाही. राजेशचे लग्न हे त्याच्या लोकप्रियतेचे गमक होते काय ? लग्नापूर्वीच राजेशची ९ चित्रे



राजेश खन्ना — कॅरेक्टरसाठी शराबची निवड



आर. एम. फिल्मसच्या ' खेल खेलमें ' च्या सेटवरील खेळाडू वातावरण : प्रीती (अशोककुमार कन्या) निथुसिंग, रिशी कपूर व दिग्दर्शक रवी टंडन.

ओळीने फ्लॉप झाली होती. कुणीतरी म्हणाले राजेशच्या लग्नाला जेवढी पब्लिक जमली आहे, तेवढी त्याच्या पिक्चरला का जमत नाही ?
एके ठिकाणी राजेशची पिक्चर्स पडत होती आणि दुसरीकडे राजेशच्या लग्नाला पब्लिक ही भीड करीत होती. एक कोडे होते ते.
राजेशची पिक्चर्स अशीच पडत राहिली तर पुढे राजेशला कुणी घेणारच नाही अशी एक भीती होती. लोकप्रियतेच्या बाबतीत राजेशची जागा आता धर्मेंद्रने घेतली होती. संजीवकुमारने राजेशच्या अभिनयाचे ' राझ ' उघडे पाडले होते. राजेशचा आवाज हे राजेशचे भांडवल. पण नमकहराममध्ये एका बाजूला अमिताभचा भरदार आवाज व दुसऱ्या बाजूला राझा मुरादचा गहरा आवाज यामध्ये राजेशच्या आवाजाला कुणी विचारले नाही.
पब्लिक राजेशमुळे एकूणच बोअर झाली होती. ' राजेश चेहेरा अब सह नही जाता है ' लोक म्हणू लागले. राजेश खन्ना ! हे नाव उच्चारताच ' दिल दौलत दुनिया 'मध्ये हेलन जशी फुलते तशी पब्लिक खुलायची. ' आन मिलो सजना ' बघण्यासाठी कॉलेजला दांडी मारून आलेल्या लडकियाँ थिएटरमध्ये, ' फिर कब मिलोगे ?' असा सवाल राजेशने पडद्यावर विचारताच कोरसमध्ये उत्तर द्यायच्या, ' जब तुम कहोगे '. राजेशच्या फॅन्सच्या, फॅनगिरीच्या अशा गोष्टी खूप सांगता येतील. तर ते सोडा ! आता काय झालं होतं ? आता राजेश कुठे होता. प्रोड्युसर्स राजेशला साईन करीत होते. मुहूर्त होत होते. ' राजेश खन्ना ' हे एक धोक्याचे प्रपोझल आहे असे कुणालाच वाटत नव्हते काय ?
राजेशलाही आपले एक चित्र तरी चालावे असे वाटत होतेच.
आणि म्हणूनच त्याला आता आपल्या कामामध्ये मन लावणे जरूर होते. कुठल्याही अदाकाराने कमीत कमी पडद्यावर आपण सिन्सिअर आहोत—आपण काही भंकस चालवली नाही एवढे प्रेक्षकापर्यंत पोचवायचे असते. राजेशच्या हिरोगिरीमध्ये आणि स्टाईलबाजीमधून प्रेक्षकापर्यंत त्याची सिन्सिरिटी कधीच पोहोचत नव्हती.
' मी आता केवळ हिरोच्या भूमिका करत नाही. त्याने एका पत्रकाराला मुलाखत देताना सांगितले. ' अविष्कार ' मध्ये त्याला शर्मिला हिंदी पिक्चरचा हिरो म्हणते त्यावेळी तो जसा तिच्यावर चिडतो, त्याप्रमाणे राजेशला कदाचित ' हिरो ' या शब्दाची चीड येऊ लागली असेल. पण राजेशला आता हिरो म्हणून एक कार्डबोर्ड कॅरेक्टर करू नये असे मात्र वाटू लागले आहेसे दिसते आहे. ' प्रेमनगर 'मध्ये त्याने शराबी प्रिन्सची भूमिका केली आहे. नाहीतरी शराबी माणूस म्हटल्यावर त्याची एक कॅरेक्टर असतेच. ' आपकी कसम 'मध्ये त्याने संशयी नवऱ्याची कॅरेक्टर केली आहे. ही दोन्ही चित्रे चालली, हिट झाली आणि या दोन्ही पिक्चर्स चालण्यामध्ये राजेशचा हात कोणी नाकारू शकणार नाही. राजेशचे —लोकप्रियता मिळता-मिळताच आपण दिलीपकुमारप्रमाणे वेगवेगळ्या भूमिका कराव्यात आणि आपले चित्रपट दिलीपकुमारप्रमाणे टायमिंग साधून पडद्यावर यावेत असे मनसुबे — पण हे मनसुबे — मनसुबेच ठरले. लोकप्रियतेच्या लाटेमध्ये तो चांगलाच ' बहका गया ' होता. त्याला अनेकवेळा आपल्या शब्दाची आठवण द्यावी, त्यावेळी तो भानावर यायचा नी

म्हणायचा, " देर हुई है, लेकिन दुरुस्त हूँ. " पटत नसे. हा माणूस दुरुस्त आहे म्हणून ! पण आता थोडे थोडे पटू लागले आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे राजेश आपल्यापेक्षा चॅलेंजिंग व्यक्तिला घाबरायचा. तो एरवी तसा भित्रा होताच. आपली लोकप्रियता हटेल, आपल्यापेक्षा चांगला अभिनय करून एखादा कलाकार आपल्याला फिका पाडील, हे त्याला भय होतेच. 'आपकी कसम 'मध्ये, त्याचा मुकाबला संजीवकुमारशी होता. काही झालं तरी संजीव हा त्याच्यापेक्षा श्रेष्ठ कलाकार आहेच आणि आता सर्वमान्यही आहे. संजीव आपल्या भूमिकेविषयी म्हणालाच, की 'माझी भूमिका थोडी आहे.' परंतु तरीही तो काही प्रसंगात राजेशला खाऊन टाकील ही भीती होतीच. तरीही 'आपकी कसम 'मध्ये राजेशने संजीवकुमारबरोबर भूमिका केलीच आणि चांगली निभावलीही. त्यानंतर हेमाबरोबर. 'हेमा उंच आहे' इथपासून अनेक कारणामुळे राजेश हेमाबरोबर येत नव्हता. याचं कारण लोकप्रियतेतील स्पर्धा. हेमा आणि राजेश एकत्र आली असती तर अधिक लोकप्रीय कोण अशी चर्चा झाली असती; याचे राजेशला भय वाटत होते. पण आता तो त्या भीतीच्याही पलिकडे गेला आहे.


'प्रेमनगर 'मध्ये, हेमाने राजेशबरोबरचे काही प्रसंग खाऊन टाकले आहेत. परंतु, अखेर राजेशशी ती दुष्टपणे वागते आणि प्रेक्षकांची सहानुभूती राजेशच्या पदरात जाऊ देते. हेमाला आपली ही गलती लक्षात आली नसेल असे नाही. पण ज्याअर्थी राजेश आता आपल्याबरोबर आणखी काही भूमिका करण्यास तयार आहे, हे पाहून तिला तो अवघड प्रसंगात कोसळून पडावा असे वाटले नसेल.

काही असो. संजीव आणि हेमाच्या मुकाबल्यानं राजेश उभा राह्यला हेही काही कमी नाही !

## नवी उचलेगिरी

'सारा आकाश 'कर्ते बासू चतर्जी यांनी विदेशी चित्रपटाची उचलेगिरी करण्याची नवीन वाट शोधून काढली आहे याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. नाहीतरी शम्मी कपूर 'इर्मा ला डूस 'ची स्टोरी उचलून मनोरंजन काढतो. हृषिकेश मुखर्जी 'बेकेट 'ची स्टोरी उचलून 'नमक हराम' काढतो. धंदेवाईक सिनेमावाले हॉलीवुडच्या स्टोरीज उचलण्यापलीकडे कुठे जाणार ? त्यांना कुठे कुठे चांगल्या स्टोरीज दडलेल्या असतात ते कुठे ठाऊक असतं ? फिल्म सोसायटचावाले नाना देशातले सिनेमे दाखवत असतात. आता प्रत्येक देशामधल्या बऱ्या वाईट स्टोऱ्या पडद्यावर आलेल्या असतात. त्या पहाता पहाता मलाही विचार यायचा, आमचे सिनेमावाले 'ह्या स्टोऱ्यांची उचलेगिरी करण्याची आयडिया करतात की नाही !' अखेर बासू चतर्जी यांनी सुमारे पाच वर्षांपूर्वी एका झेक चित्रपट महोत्सवात गाजलेले चित्र 'दि रोमान्स ऑफ दि ब्युगल 'ची स्टोरी उचलण्याची आयडिया केली. अर्थात ते पिक्चर गाजले ते त्यामधील सुमारे दहा मिनिटे दाखविलेल्या नग्न दृश्यामुळे. एरवी हे चित्र सामान्य सेटीमेंटल चित्र होते. बासू चतर्जी यांनी त्या नग्न स्त्रीच्या भूमिकेसाठी पद्मा खन्नाला घेतली होती. निवड अचूक होती. पण, तिच्या अंगावरून जराही वस्त्र न उतरवल्यामुळे बॉक्स-ऑफिसला हे चित्र ओढणे कठीण होते.

एरवी ही स्टोरी बासूंनी पेश करण्याचे



बी. आर. इशारा दिग्दर्शित 'प्रेमशास्त्रा 'चा पाठ कोण कुणाला देतोय ? देव बिंदुला का बिंदु देवला ?

कारण काय ? मूळ झेक चित्रातला जो जत्रेचा ढंग आहे, तो चित्रात उतरवण्यास बासू अयशस्वी झाले आहेत. नवचित्रवाल्यांचे हातखंडा छायाचित्रकार के. के. महाजन यांनीही खास कामगिरी केली नाही आणि आजोबा (राजा परांजपे) मरतो आणि त्याचे सोपस्कार त्याचा नातू (विनोद मेहेरा) करीत बसतो यातील एक भकास एकाकी मूड आहे, तोही आपल्या अंगावर येत नाही.

एकूण काय बासूजींची ही नवी उचलेगिरी काही खरी नाही.

## धडपड–तडफड पूर्ण झाली

नव्या चित्रपटाच्या लाटेने अनेक होतकरूंच्या डोक्यात सिनेमा काढावा असले विचार भरले आहेत. स्वाभाविकच आहे. हिंदी धंदेवाईक सिनेमाविषयी–मत्सर म्हणा किंवा हेवा म्हणा–कशामुळे तरी जे असंतुष्ट लोक निर्माण झाले त्यांना वाटत असायचं की, जर आपल्या हातात पैसा किंवा कॅमेरा असता तर–.


फिल्म डिव्हिजनचे कर्मचारी भाई भगत तसे काही हिंदी धंदेवाईक सिनेमाविषयी भडकलेले असतील असे वाटत नाही. कारण पूर्वी त्यांचा विश्राम बेडेकर, स्व. वा. गुरुदत्त वगैरे मंडळींशी संबंध आला होता. पण कुठे तरी त्यांना हा सिनेमा काढण्याचा विंचू चावला असावा. ते श्री. ना. पेंडसे यांची 'यशोदा' ही कादंबरी पडद्यावर आणताहेत. 'यशोदा' ही कादंबरी त्यांनी निवडली या एकाच गोष्टीवरून त्यांची सिनेमाची जाण तंदुरुस्त आहे, हे निश्चित. नवचित्रपटवाल्यांना फिल्म फिनान्स कॉर्पोरेशनकडून कर्ज मिळण्याची व्यवस्था झाल्यामुळे तो फार मोठा आधार होता.

भाई भगत यांनीही कर्जासाठी अर्ज केला होता. सत्यजित रे यांच्या शब्दामध्ये कॉर्पोरेशन अध्यक्ष बी. के. करंजिया अत्यंत सढळ हस्ताने पैसे वाटीत होते. मग भाई भगतना कर्ज मिळण्यास काही अडचण दिसत नव्हती. पण भाई भगतना कर्ज नाकारण्यात आले. यामागे एक सूत्र आहे. कॉर्पोरेशनच्या लेखीं मराठी किंवा इतर भाषा या हिंदी भाषेच्या तुलनेने दुय्यम महत्त्वाच्या असाव्यात, हे उघड आहे. हिंदी भाषेतील चित्रपटाला मार्केट आहे, हिंदी नवचित्रपटातले नट–नटया, दिग्दर्शक उद्या धंदेवाईक बनू शकतील. मराठीसारख्या भाषेतील चित्रपटातून काय होण्यासारखे आहे.

भाईला कर्ज नाकारले. तेव्हा एका अर्थी बरे वाटले. या देशात कुणीतरी उडया मारू लागला नी त्याच्या उडया थांबल्या की बरे वाटते. कश्याला भाईचे उपद्व्याप यशोदा–विशोदा ?

पण एक दिवस भाई पुन्हा उडया मारू लागला. यशोदाचे काम पुढे सुरू केले. त्यासाठी पगार–पाणीही खर्ची घालू लागला. पैसे कसे आणत होता नी कसे पिक्चर घेत होता देव जाणे. पर्वा त्याच्या सिनेमात काम करणाऱ्या सौ. सुलभा कोराने म्हणाल्या, 'भारीच जिद्दीचा माणूस आहे हा भाई भगत'. एकदम पटले. एखाद्या मराठी माणसाने मनात योजून ठेवलेली एखादी गोष्ट पुरी केली की आपल्या मनातले लाख कोसळलेले बेत आठवतात नी आपण त्याच्यापुढे नम्र होतो.

भाई भगतने 'यशोदा' पूर्ण केली. त्याला डिस्ट्रिब्युटरही मिळाले. अर्थात हे फिल्म फिनान्स कार्पोरेशनच्या नाकावर टिच्चून याचा मला आनंद होतो. साले एखादे 'गर्म हवा' काढतात की केवढा टामटुम करतात. तुमची एवढी मोठी संस्था जेवढे करते, तेवढे आमचा एकटा भाई भगत करतो. दुसरी एक मराठी माणसासाठी लंब्या चवड्या गप्पा मारणारी सेना आहे, तिच्याकडेही भाई गेला नाही, याचा आपल्याला आनंद आहे. भाई सारखा मदत करण्यास लायक माणूस पण, 'सेना' तिच्या पाठीमागे उभी रहाणारच नाही ! तसे म्हटले तर 'सेने'च्याच मंडळींच्या 'शूरा मी वंदिले'च्या पाठीमागे कुठे ती उभी आहे. मागे त्या चित्राच्या निर्मात्यांनी आम्हाला 'रशेस' पाह्यला बोलावले होते. चित्र अद्याप अपूर्णच आहे. कित्येक वर्षं चाललंय–चाललंय. आम्ही निर्मात्यांना विचारले हे असे का ?' तर ते शम्मीकपूरच्या स्टाईलमध्ये म्हणाले, 'वोह किस्सा फिर कभी ! □



निर्माते–दिग्दर्शक भाई भगत यांची यशोदा–कुंदा भगत.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर